# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२१

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक ०३ मार्च, २०२१ / माघ ५, १९४२ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री**
**(३) कामगार, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**
**(४) ऊर्जा मंत्री**
**(५) इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री**
**(६) आदिवासी विकास मंत्री**
**(७) सहकार, पणन मंत्री**
**(८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४६**

---

### नाशिक जिल्हयात निर्माण करण्यात आलेली सौर ऊर्जा महावितरण कंपनीने विकत घेवून इतर राज्यांना विक्री करण्याबाबत

**(१) * २२२६३ श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विजेचा वापर कमी करुन पर्यावरण पुरक सौर ऊर्जेचा अधिकाधिक वापर होण्यासाठी शासकीय इमारती, कारखाने तसेच उपहारगृहे इ. ठिकाणी सौर ऊर्जेचे पॅनल्स बसविले जात आहेत, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर आस्थापनांना लागणारी वीज वगळता शिल्लक असलेली वीज महावितरण कंपनीच्या ग्रीडला जोडताना आता फक्त वीस टक्केच वीज घेतली जाणार असल्याचे परिपत्रक काढण्यात आल्याने सौर ऊर्जेची पॅनल्स बसविणे संस्थांनी थांबविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त परिपत्रकामुळे शासनाच्या सौर ऊर्जा योजनेच्या व्यवस्थेमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाशिक जिल्हयात निर्माण झालेली सौर ऊर्जा वीज महावितरण कंपनीने विकत घेवून इतर राज्यांना विकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) होय. मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि.३० डिसेंबर, २०१९ रोजी "ग्रीडला जोडलेली परस्पर सक्रीय छपरावरील नुतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा विनियम, २०१९" जाहीर केलेले असून ते दि.३० डिसेंबर, २०१९ पासून लागू झालेले आहे. सदर विनियम महावितरण कंपनीकडून अंमलात आणण्यात येत आहेत.
(२) नाही. उक्त विनियम, २०१९ नुसार नक्त मापन व्यवस्थेअंतर्गत अशा यंत्रणेमधून निर्माण झालेली ऊर्जा लागू असलेल्या देयक कालावधीत महावितरण कंपनीने पुरवठा केलेल्या विजेचे परिमाण समायोजन केल्यानंतर शिल्लक असलेली वीज ग्रीडमध्ये दिली जाते. अशी ग्रिडमध्ये दिलेल्या वीजेचे युनिट्स दुस-या महिन्यात समायोजित केले जातात व वर्षाअखेर असमायोजित असलेली संपूर्ण जमा वीज (युनिट्स) मा.आयोगाने ठरवून दिलेल्या दराने महावितरण कंपनी खरेदी करते व ते बंधनकारक आहे. त्यामुळे संबंधित ग्राहक आस्थापनांनी स्वयंवापर केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या वीजपैकी फक्त २०% वीज महावितरण कंपनीमार्फत विकत घेतली जाते असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही. तसेच अशा प्रकारचे कोणतेही परिपत्रक महावितरण कंपनीने काढलेले नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवडीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहीमेबाबत

**(२) * २१८०९ श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१४ ते २०१९ या कालावधीतील तत्कालीन शासनाच्या काळात ३३ कोटी वृक्ष लागवडीसाठी विशेष मोहीम राबविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोहीम राबविण्यासाठी कोटयवधी रुपये खर्च करुन देखील प्रत्यक्षात वृक्ष लागवड व संगोपन करण्यात आलेले नसून, यापैकी किती निधी खर्चित झाला असून व किती अखर्चित राहिला आहे,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने संबधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे :** (१) सन २०१७ ते २०१९ या कालावधीत वन विभाग तसेच इतर शासकीय यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, उद्योगसमूह, बांधकाम व्यावसायिक, खाजगी व्यक्ती इत्यादीच्या माध्यमातून ५० कोटी वृक्ष लागवडीची विशेष मोहीम राबविण्यात आली होती.

(२) ही मोहीम राबविण्यासाठी सन २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीत वन विभागाकरीता मुख्यत्वेकरुन लेखाशीर्ष ४४०६ ०४९२ अंतर्गत रु. २४२९.७८ कोटी निधी प्राप्त झाला होता. सदर निधीचा पूर्णत: वापर करण्यात आला आहे. सदर मोहिमेत वन विभागाकडून २८.२७ कोटी वृक्ष लागवड करण्यात आली असून ऑक्टोबर २०२० अखेर ७५.६३ % रोपे जिवंत आहेत व त्यांची देखभाल करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान (जि.नागपूर) या संस्थेच्या विविध कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३) * २३३४४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी)** : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील बार्टीच्या अधीनस्थ असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान संस्थेमध्ये चुकीच्या पद्धतीने निविदा प्रक्रिया राबविणे, निविदा न काढता काम देणे तसेच प्रतिष्ठानने गेले तीन वर्षाचा सुमारे १६ कोटी रुपये खर्चाचा हिशोब न देता यामध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी चौकशी करुन त्याचा अहवाल महिन्याभरात देण्याचे आदेश मंत्री महोदयांनी दिनांक २१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी अहवाल सादर केला आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषीविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) या प्रकरणी चौकशी समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीमार्फत चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द धरणाचे दरवाजे उघडल्याने नुकसान झालेल्या पुरग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(४) * २१०६८ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), डॉ.देवराव होळी (गडचिरोली)** : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द धरणाचे ३३ दरवाजे नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना न देता माहे ऑगस्ट, २०२० मध्ये उघडण्यात आल्याने चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर या जिल्हयात पुरपरिस्थिती निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणांचे दरवाजे उघडल्यामुळे पुरसदृश परिस्थिती निर्माण होऊन शेतकऱ्यांची शेतपिके व जनावरे वाहून गेल्याने तसेच घरांची पडझड झाल्याने ग्रामस्थांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना न देता धरणाचे दरवाजे उघडण्यात आल्याने ही पुरपरिस्थिती निर्माण झाली असून या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, तद्नुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, नुकसानीचे पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे खरे नाही,गोसीखुर्द प्रकल्पाचे दरवाजे उघडताना संबंधित यंत्रणांना पुर्वसुचना देण्यात आली होती.

(२) होय.

(३) गोसीखुर्द प्रकल्पाचे दरवाजे उघडताना संबंधित यंत्रणांना पुर्वसुचना देण्यात आली होती. धरणातुन विसर्ग टप्पा टप्प्याने पूर्वसुचना देवुन वाढविण्यात आला आहे. सदरची बाब अतिवृष्टीमुळे उद्भवलेली असुन धरण सुरक्षितता लक्षात घेऊन नियंत्रित पूर सोडण्यात आलेला असुन उचित कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) पूरपरिस्थितीमुळे बाधित नागरिकांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दराने व विशेष वाढीव दराने दिनांक ०४/०९/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. १६४८.२५ लाख आणि दिनांक २९/०९/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. १६२८१.०७ लाख असा एकूण रुपये १७९२९.३२ लाख इतक्या निधीचे वितरण विभागीय आयुक्त, नागपूर यांना करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---------------

## मे.साई वर्धा पॉवर जनरेशन लि. (ता.वरोरा, जि. चंद्रपूर) या प्रकल्पाच्या विक्रीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(५) * २१५५५ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा (जि.चंद्रपूर) येथील रुपये २१३० कोटी रुपयांच्या मे.साई वर्धा पॉवर जनरेशन लि.या प्रकल्पावर विविध वित्तीय संस्था, कंत्राटदार, तथा महावितरण, महाट्रांसको, एमआयडीसी, डब्ल्युसीएल व इतर शासकीय कंपन्यांची एकुण ७०००.०० कोटी रुपयांची देणी असतांनाही सदर प्रकल्पाची विक्री फक्त ६३५ कोटी रुपयांना करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण, महाट्रांसको, एमआयडीसी, डब्ल्युसीएल व इतर शासकीय कंपन्यांची देणी असतांनाही या कंपन्यांचा या विक्री प्रक्रियेत समावेश करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनीची विक्री करण्यात आल्याने महावितरण, महाट्रांसको, एमआयडीसी यांची देणी प्रलंबित राहिल्याने झालेल्या नुकसानाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले त्यानुषंगाने साई वर्धा पावर जनरेशन लि. कंपनीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१), (२), (३), (४) व (५) मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांच्या दिनांक १७.१०.२०१९ च्या आदेशामध्ये मे. साई वर्धा पॉवर जनरेशन लि. या कंपनी विरुद्ध रुपये ६८४८.८५ कोटी दावे असल्याचे (Admitted Claims) मान्य केले आहे. त्यापैकी राज्य शासनाच्या महावितरण कंपनीचे रुपये १२१,७५,००,०००/-, महापारेषण कंपनीचे रुपये ११९,५१,७५,४९१/-, एमआयडीसीचे रुपये १८,७३,००,०००/- व महाराष्ट्र राज्यभार प्रेषण केंद्र यांचे रुपये १८,७३,००,०००/- तसेच वेस्टर्न कोलफील्ड कंपनीचे रुपये ७५३,९३,००,०००/- दायित्व असल्याचे स्पष्ट केले आहे.

मा. विद्यूत नियामक आयोगाने दिनांक ०१.१२.२०१८ रोजीच्या आदेशानुसार मे. साई वर्धा पॉवर जनरेशन लि. कंपनीने रुपये ५०.४४ कोटी महावितरण कंपनीला परत करावे असा निर्णय दिला. महावितरण कंपनीने रुपये ५०.४४ कोटी अधिक व्याज रुपये ७१.३१ कोटी असे एकूण रुपये १२१.७५ कोटी देण्याबाबत साई वर्धा पॉवर जनरेशन कंपनीला पत्राद्वारे कळविण्यात आले. त्यावर मा. विद्यूत नियामक आयोगाचे केस नं. २०६/२०१४ मधील दिनांक ०१.१२.२०१८ च्या निर्णयाविरोधात मे. साई वर्धा पॉवर जनरेशन लि. कंपनीने विद्यूत अपिल न्यायाधिकरण (APTEL) दिल्ली यांचेकडे अपिल सादर केले. (अपिल नं. ४६/२०१९) जे अद्याप प्रलंबित आहे.

मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (NCLT) हैद्राबाद खंडपीठ यांनी दिनांक ०९.११.२०१८ रोजीच्या आदेशान्वये (केस नं. सीपी (आयबी) क्र. २७५/७/एचडीबी/२०१८) साई वर्धा औष्णिक विज प्रकल्पास दिवाळखोर घोषित केले. त्याअंतर्गत साई वर्धा औष्णिक विज प्रकल्पाचे मालक के.एस.के. एनर्जी ग्रुप यांनी संबंधितांनी आपआपली मागणी/ दावे सादर करावे असे जाहीर केले. त्याप्रमाणे महावितरण कंपनीने आपला रुपये १२१.७५ कोटीचा दावा सादर केला.

मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (NCLT) हैद्राबाद खंडपीठ यांनी दिनांक १७.१०.२०१९ रोजीच्या IA क्रमांक ७०३/२०१९ अंतर्गत एक आदेश पारीत केला. सदर आदेशाप्रमाणे महावितरण कंपनीचा रुपये १२१.७५ कोटीचा दावा मान्य करण्यात आला आहे. परंतु हा दावा “Contingent Claims Pending Litigations” अंतर्गत Contingent Claims म्हणून मान्य करण्यात आला असून सदर दावा २४ महिन्यापर्यंत वैध्य राहील. त्यावर दावे ४५ दिवसांच्या आत अपिल सादर केल्याने व ते अपिल सदर मुदतीत सादर न झाल्याने मा. NCLAT ने सदर अपिल दिनांक १८.०९.२०२० रोजी खारीज केले.

महापारेषण कंपनीने थकीत ट्रान्समिशन चार्जेसच्या मे. साई वर्धा पॉवर जनरेशन लि. कंपनीने वीज बिल भरणा थांबविल्यामूळे ट्रांसमिशन चार्जेस थकबाकीचा भरणा करण्याबाबत मे.साई वर्धा पॉवर कंपनीस नोटीस दिली होती. तसेच महापारेषण कंपनीने मा. नॅशलन कंपनी लॉ ट्रिब्यूनल मध्ये मे. साई वर्धा पॉवर जनरेशन कंपनीच्या विरोधात रुपये ११९,५१,७५,४९१/- रुपयांचा ट्रांसमिशन चार्जेसच्या थकबाकीचा दावा केला होता. तथापि, मा. नॅशलन कंपनी लॉ

ट्रिब्यूनलने रुपये ३४,७०,६२,५१९/- इतकी महापारेषण कंपनीला देय असलेली रक्कम मान्य केली. उर्वरित रक्कम आकस्मिक म्हणून घोषित केली. महापारेषण् कंपनीने मा. नॅशलन कंपनी लॉ ॲपिलेट ट्रिब्यूनल यांचेकडे याचिका दाखल केली. सदर याचिका अमान्य झाल्याने महापारेषण कंपनीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

वेस्टर्न कोलफील्ड्स लि. कंपनीने मा. नॅशलन कंपनी लॉ ट्रिब्यूनल मध्ये मे. साई वर्धा पॉवर जनरेशन कंपनीच्या विरोधात रुपये ७५३.९३ कोटीचा दावा दाखल केला आहे. सदर न्यायालयाने वेस्टर्न कोलफील्ड्स लि. कंपनीचा रु. ७५३.९३ कोटीचा दावा Contingent claims मान्य करण्यात आला आहे. त्यामूळे सदर निर्णयाच्या विरुद्ध वेस्टर्न कोलफील्ड्स लि. मा. नॅशलन कंपनी लॉ ॲपिलेट ट्रिब्यूनल, नवी दिल्ली यांचेकडे याचिका दाखल केली असून सदर याचिका प्रलंबित आहे.

-----------------

## बार्शीटाकळी (जि.अकोला) वन परिक्षेत्रातील परंडा रोप वनात ५० कोटी वृक्ष लागवडीत झालेला गैरव्यवहार

**(६) * २१५२६ श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम) :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्शीटाकळी (जि.अकोला) वन परिक्षेत्रातील परंडा रोप वनात सन २०१७ मध्ये ५० कोटी वृक्ष लागवड योजनेंतर्गत निंदनाच्या कामावर बनावट मजूर म्हणून आयटीआय कॉलेजच्या विद्यार्थ्यांस दाखवून गैरव्यवहार केल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सबंधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे :** (१) बार्शीटाकळी (जि. अकोला) वन परिक्षेत्रातील परंडा रोप वनात सन २०१७ मध्ये ५० कोटी वृक्ष लागवड योजनेंतर्गत निंदनाच्या कामावर बनावट मजूर म्हणून आयटीआय कॉलेजच्या विदयार्थ्यांस दाखवून गैरव्यवहार केल्याची तक्रार मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती यांना प्राप्त झाली आहे.
(२) सदर प्रकरणी उपवनसंरक्षक (प्रादेशिक) अकोला यांचे कार्यालयामार्फत चौकशी करण्यात येत आहे. चौकशी अहवाल अद्यापपर्यंत अप्राप्त आहे.
(३) व (४) चौकशीत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील जंगलात अवैध वृक्षतोड होत असल्याबाबत

**(७) * २३९८० डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.रावसाहेब अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील डोंगराळ भागात वन क्षेत्रपालांच्या दुर्लक्षामुळे अवैध वृक्षतोड होत असल्याचे दिनांक ११ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंधार तालुक्यातील शेल्लाळी, सावरगांव, फुलवळ, रुई, निपानी व आंबुलगा आदी गावात विनापरवाना वन विभागाच्या सागवानाच्या झांडाची मोठ्या प्रमाणात तोड करुन साहित्य बनवले जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त साहित्य अधिकाऱ्यांच्या संगनमताने दुकानात विकले जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने वनातील वृक्षांची अवैध तोड करणाऱ्या व त्यांना मदत करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे :** (१) हे खरे नाही.

दि.११ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास अवैध वृक्षतोड झाली नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर-मूल (जि.चंद्रपूर) हा भ्रमणमार्ग वन्यप्राण्यांसाठी धोकादायक ठरत असल्याबाबत

**(८) * २०९७९ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर-मूल हा भ्रमणमार्ग वन्यप्राण्यांसाठी धोकादायक ठरत असून शमन उपायांअभावी या भ्रमणमार्गावर गेल्या १० वर्षांत वाघ, बिबट्यांसह सुमारे १०० वन्यजीवांचा बळी गेला असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ताडोबा-अंधारी, बोर, नवेगाव-नागझिरा व्याघ्रप्रकल्प तसेच इंद्रावती, कावल आणि घोडाझरी अभयारण्यांना जोडणाऱ्या सुरू असलेल्या ९ रस्ते प्रकल्पांमुळे वन्यजीव भ्रमणमार्गाला अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळुन आले व तद्नुसार सदरहू प्रकल्पांचे काम तातडीने पुर्ण करून भ्रमणमार्ग मोकळा करण्याबाबत शासनाकडुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे :** (१) हे खरे नाही.

सन २०१३ ते २०२१ (दिनांक २३.०२.२०२१ पर्यंत) या कालावधीत चंद्रपुर-मुल हा राष्ट्रीय महामार्ग वन्यप्राण्यांचा भ्रमणमार्गात येत असल्याने चितळ-१०, रानडुक्कर-२, बिबट-१, अस्वल-१ असे एकूण १५ वन्यप्राण्यांचा मृत्यु

झाला आहे.

(२) प्रामुख्याने मूल-चंद्रपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९३०, नागभीड-मूल राज्य महामार्ग-९, चिमूर-वरोरा राष्ट्रीय महामार्ग ३५३ E, बामणी-नवेगाव राष्ट्रीय महामार्ग ३५३ B व हिंगणघाट-मूल राज्य महामार्ग-३३२ या रस्ते प्रकल्पांमुळे वन्यप्राण्यांच्या भ्रमण मार्गात अडथळा निर्माण होत आहे.

(३) चंद्रपूर जिल्हयातील वन्यप्राण्यांच्या भ्रमणमार्गात अडथळा निर्माण करण्याऱ्या मुल-चंद्रपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९३० रस्त्यादरम्यान १० ठिकाणी, नागभीड-मूल राज्य महामार्ग-९ रस्त्यादरम्यान ०२ ठिकाणी, बामणी-नवेगाव राष्ट्रीय महामार्ग ३५३ B रस्त्यादरम्यान ०५ ठिकाणी, चिमूर-वरोरा राष्ट्रीय महामार्ग ३५३ E रस्त्यादरम्यान ०१ ठिकाणी व हिंगणघाट-मूल राज्य महामार्ग-३३२ रस्त्यादरम्यान ०५ ठिकाणी संबंधित यंत्रणांना उपशमन योजना करण्याबाबत सुचविण्यात आल्या आहेत.

वन्य प्राण्यांच्या भ्रमणमार्गात अडथळा निर्माण करणाऱ्या रस्ते प्रकल्पांमध्ये वन्यजीवांच्या संरक्षणाकरीता उपशमन योजना राबविण्याकरीता मूल-चंद्रपूर रस्त्याकरीता रु.४०२.२९ कोटी तसेच बामणी-नवेगाव राष्ट्रीय महामार्ग ३५३ B रस्त्याकरीता रु. २५६.२३ कोटी रुपयांची आवश्यकता आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील गृहनिर्माण संस्थांची मानीव अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेअन्स) प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(९) * २०७५७ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या १० वर्षात केवळ ११ हजार गृहनिर्माण संस्थांचा जमिनीवर मालकी हक्क प्रस्थापित झाला असून अद्यापपर्यंत ८५ हजार संस्थांची प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गृहनिर्माण संस्थापैकी काही मोडकळीस आलेल्या व काही पुनर्विकास करावयाच्या असल्याने मानीव अभिहस्तांतरणाची प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गृहनिर्माण संस्थांनी आपली जमीन सोसायटीच्या मालकीची करण्यासाठी मानीव हस्तांतरणाचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणात सहकार उपनिबंधकाकडे सादर केले असून, मानीव हस्तांतरणाची प्रक्रिया कालापव्यय होणारी आणि क्लिष्ट असल्याने शासकीय कार्यालयात मध्यस्थी आणि दलालांचा यामध्ये अंतर्भाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या गृहनिर्माण सोसायट्यांची फसवणूक करणाऱ्या दलांलावर कारवाई करण्याबाबत तसेच राज्यातील गृहनिर्माण संस्थांना मानीव अभिहस्तांतरणाची (डीम्ड कन्व्हेअन्स) ची प्रक्रिया सुलभ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही.

राज्यातील संबंधित जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांच्या कार्यालयाकडे दि.३१.०१.२०२१ पर्यंत मानीव अभिहस्तांतरणाचे १४,८२२ अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी १३,६५५ अर्जांवर कार्यवाही करुन त्यांचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले आहेत. उर्वरित ११६७ अर्जांवर कार्यवाही सुरु आहे.

(२) नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

तथापि, शासनाने दि.२२.०६.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मानीव अभिहस्तांतरणासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची संख्या कमी केलेली असून, सदर प्रक्रियेमध्ये सुसुत्रता आणली आहे. या प्रक्रियेमध्ये दलालांचा व मध्यस्थांचा सहभाग असल्याबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-------------

## सोलापूर शहरात रमाबाई घरकूल योजनेमध्ये स्वसुरक्षित झोपडपट्टीची अट रद्द करुन अनुदानाची रक्कम वाढविण्याबाबत

**(१०) * २२५९० कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील झोपडपट्टीधारकांना रमाई घरकूल योजनेचा लाभ घेण्यासाठी स्वसुरक्षित झोपडपट्टी ही जाचक अट लादल्याने शहरातील ६२ पेक्षा अधिक झोपडपट्टया रमाबाई घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेत असलेली स्वसुरक्षित ही जाचक अट रद्द करुन सदरहू योजनेकरिता मिळणाऱ्या अनुदानाच्या रकमेत वाढ करुन रुपये ७,००,०००/- करण्याबाबत स्थानिकांकडून शासनाकडे वेळोवेळी मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने उक्त योजनेत असलेली स्वसुरक्षित ही जाचक अट रद्द करुन सदरहू योजनेकरिता मिळणाऱ्या अनुदानाच्या रकमेत वाढ करुन रुपये ७,००,०००/- करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

राज्य शासनाच्या धोरणानुसार सन १९९५ पर्यंतच्या झोपडीधारकांना संरक्षित झोपडीदार म्हणून घोषित केल्याने सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे. त्यानुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.१५.०३.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार दि.१.१.१९९५ या दिनांकास राज्य शासन, महानगरपालिका, नगरपालिका,स्थानिक स्वराज्य संस्था, एमएमआरडीए, शासनाचे उपक्रम यांच्या जमिनीवर अतिक्रमण करून त्या ठिकाणी राहत असलेले व दि.१.१.१९९५ रोजी त्यांचे घरकुल/निवासस्थान सदर जमिनीवर असल्यास आणि त्यांना संरक्षित झोपडीदार म्हणून संरक्षण प्राप्त झालेले असल्यास अशा लाभार्थ्यासाठी ७/१२ चा उतारा सादर करण्याची अट शिथिल करण्यात आलेली आहे.

रमाई आवास घरकुल योजना ही केंद्रीय पंतप्रधान आवास योजनेच्या धर्तीवर आधारीत असून पंतप्रधान आवास योजनमधील घरकुलाच्या अनुदानात वाढ करण्यात आल्यानंतर, रमाई आवास घरकुल योजनेच्या अनुदानाच्या वाढीबाबत शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## जोगेश्वरी-गोरेगांव (मुंबई) येथील आरे वसाहतीमधील आदिवासी पाडे विकासापासुन वंचित असल्याबाबत

**(११) * २३७७५ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी-गोरेगाव (मुंबई) येथील आरे वसाहतीमधील आदिवासी पाडयांच्या विकासाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०१४ ते २०२० या कालावधीत जवळपास ५५ कामे प्रस्तावित केलेली असताना शासनाने आजमितीपर्यंत त्यातील केवळ ११ विकासकामे पूर्ण केली असून उर्वरीत ४४ विकासकामे ही अद्याप प्रलंबित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरे वसाहतीमधील आदिवासी पाडयांच्या विकासाकरिता सन २०१४ पासून आजमितीपर्यंत आदिवासी विकास विभागामार्फत ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना तसेच न्युक्लियस बजेट या योजनेंतर्गत एकूण किती निधी उपलब्ध करून देण्यात आला व त्यातून या आदिवासी पाडयांमध्ये कोणकोणती विकासकामे करण्यात आली आहेत याचा वर्षनिहाय व योजनानिहाय तपशील काय आहे,

(३) तसेच, सदर आदिवासी पाडयांच्या विकासाच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रस्तावित केलेल्या महत्त्वाच्या कामांपैकी अद्याप प्रलंबित असलेली ४४ कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद शासन किती कालावधीत करणार आहे व ही कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत,

(४) तसेच, स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित प्रकल्प अधिकारी यांचेकडे सन २०१४ ते २०२० या कालावधीत प्रस्तावित केलेल्या ५५ कामांपैकी किती कामांचे प्रस्ताव संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी शासन स्तरावर मान्यतेसाठी सादर केले आहेत,

(५) असल्यास, सदरहू प्रस्ताव मान्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच या प्रकरणी विलंब करणारे संबंधित प्रकल्प अधिकारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) जोगेश्वरी-गोरेगाव (मुंबई) येथील आरे वसाहतीमधील आदिवासी पाड्यांत सन २०१४-२०२० या कालावधीत ठक्कर बाप्पा योजनेतुन प्रकल्प कार्यालय, मुंबई यांच्याद्वारे रु.३९९.३१ लाख इतक्या रक्कमेची एकूण ७३ विकास कामे घेण्यात आलेली असून त्यापैकी ५७ कामे पूर्ण झाली आहेत. १५ कामे सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेविना सुरू करता आली नाहीत, तसेच एक काम प्रगतीपथावर आहे.

(२) सन २०१४ पासून आजमितीपर्यंत आदिवासी विकास विभागामार्फत तसेच न्युक्लियस बजेट या योजनेंतर्गत केलेली कामे व झालेला खर्च याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| योजना | प्राप्त निधी (रू.लाखात) | आरे कॉलनी, गोरेगाव येथील | |
|---|---|---|---|
| | | विकास कामांची संख्या | झालेला खर्च (रू.लाखात) |
| ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा | ८६२.३५ | ७३ | ३९९.३१ |
| न्युक्लियस बजेट | २८५.५६ | ७५ (लाभार्थी) | २३.५२ |

(३) व (४) सन २०१४-२०२० या कालावधीत आरे वसाहत ठक्कर बाप्पा योजनेतुन रु.३९९.३१ लाख इतक्या रक्कमेची एकुण ७३ विकास कामे घेण्यात आलेली आहेत. तसेच सन २०२०-२१ या कालावधीत आरे वसाहतमधील रु.४६.५० लाख रक्कमेची ०८ विकास कामे घेण्यात येत आहेत. सदर कामाचा निधी त्या त्या वर्षी संबंधित यंत्रणेकडे वर्ग करण्यात आला आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यातील शेतकरी सहकारी जिनिंग ॲण्ड प्रेसिंग सोसायटी येथे कापूस खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत

**(१२) * २३६२८ श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यात शेतकरी सहकारी जिनिंग ॲण्ड प्रेसिंग सोसायटी, (जि.यवतमाळ) या संस्थेच्या जिनिंग प्रेसिंग युनिटवर शासनाने कापूस खरेदी केंद्र त्वरित सुरु करण्याबाबतचे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सहकार मंत्री यांना दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
मा.श्री. नामदेव ससाने, विधानसभा सदस्य यांचे “उमरखेड(यवतमाळ) तालुका शेतकरी सहकारी जिनिंग ॲण्ड प्रेसिंग सोसायटी, जि.यवतमाळ या संस्थेच्या जिनिंग प्रेसिंग युनिटवर शासनाने कापूस खरेदी केंद्र त्वरित सुरु करण्याबाबत”चे दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(२) हंगाम २०१९-२० मध्ये कापूस पणन महासंघाद्वारे यवतमाळ जिल्हयातील उमरखेड येथे शेतकरी सहकारी जिनिंग ॲण्ड प्रेसिंग युनिटमार्फत हमी दरावर कापूस खरेदी करण्यात आली होती. सदर खरेदी प्रक्रियेदरम्यान संबंधित सहकारी संस्थेच्या युनिटमध्ये मोठ्या प्रमाणावर कापूस साठ्याचे नुकसान झाल्याने संबंधित संस्थेकडून सी.सी.आय.च्या निकषानुसार नुकसानीपोटी मोठ्या प्रमाणावर वसूली प्रलंबित आहे.

हंगाम २०२०-२१ मध्ये वसूली प्रलंबित जिनिग प्रेसिंग संस्था व युनिट यांना देखील कापुस खरेदीचे काम मिळावे या दृष्टीने अशा संस्थांकडून मागील हंगामाच्या वसूलीपोटी बँक गॅरंटी घेण्याचा धोरणात्मक निर्णय कापूस पणन महासंघाच्या संचालक मंडळाच्या सभेत ठराव करुन घेण्यात आला. त्यानुसार शेतकरी सहकारी जिनिंग प्रेसिंग संस्थेला बँक गॅरंटीची पूर्तता करण्यास कळविण्यात आले होते. तथापि, संबंधित संस्थेकडून बँक गॅरंटीची पूर्तता न झाल्याने सदर संस्थेच्या युनिटमध्ये हंगाम २०२०-२१ मध्ये हमी दराने कापूस खरेदी सुरु करता आली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हयातील कापूस हमीभाव खरेदी केंद्रे सुरु करण्याबाबत

**(१३) * २१९६५ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना राज्य शासनाने रुपये ५५०० ते ५८०० प्रति क्विंटल हमी भाव मंजुर केला असून केवळ नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचा कापूस हमी भाव खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्हयातील हजारो कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी हमीभावासाठी नोंदणी केली असून माहे ऑक्टोबर, २०२० अखेरपर्यंत जिल्हयात एकही खरेदी केंद्र सुरु करण्यात आलेले नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, हमीभाव केंद्र सुरु न केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना खासगी व्यापाऱ्यांना अल्प दराने कापूस विक्री करावी लागत असून शेतकऱ्यांचे ८०० ते १००० रुपये प्रति क्विंटल आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये व त्यांच्या पिकांना योग्य भाव मिळावा यासाठी तात्काळ हमीभाव खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाकडून दरवर्षी कापसाला किमान आधारभूत दर जाहीर करण्यात येतो. त्याप्रमाणे, दिनांक १/०९/२०२० रोजीच्या आदेशान्वये हंगाम २०२०-२१ साठी कापसाला मध्यम धागा-रुपये ५५१५ प्रति क्विंटल तर लांब धागा-रुपये ५८२५ प्रति क्विंटल असे किमान आधारभूत दर निश्चित करण्यात आले आहे.

राज्यात हमीदराने कापसाची खरेदी, केंद्र शासनाच्या मुख्य अभिकर्ता भारतीय कपास निगम लि. (C.C.I.) व त्यांचे उप अभिकर्ता म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्या. यांच्याद्वारे केली जात आहे. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कृषी उत्पन्न बाजार समितीकडे नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडूनच FAQ दर्जाच्या (८ ते १२ टक्के आर्द्रता) कापसाची हमीभावाने खरेदी केली जात आहे.

(२) अंशत: खरे आहे.

हंगाम २०२०-२१ साठी बीड जिल्ह्यामध्ये C.C.I. द्वारे ५ नोव्हेंबर, २०२० व कापूस पणन महासंघाद्वारे दिनांक ३ डिसेंबर, २०२० पासून हमीभावाने कापूस खरेदीस सुरुवात झालेली आहे.

(३) हे खरे नाही.

हमीदराने कापूस खरेदी केंद्र सुरु करण्यापूर्वी शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दराने कापूस विक्री करावी लागत असल्याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. बीड जिल्ह्यात एकूण १० खरेदी केंद्रावर दिनांक ०८/०२/२०२१ पर्यंत एकूण १०.२४ लक्ष क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात जिल्हा परिषदेच्या दिव्यांग कल्याणकारी योजनेच्या भत्त्यात कपात केल्याबाबत

**(१४) * २४१३० श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदेच्या सन २०२०-२१ च्या मूळ अंदाजपत्रकात पाच टक्के अपंग कल्याण व पुनर्वसन निधीसाठी तरतूद केलेल्या निधीमधून विविध दिव्यांग कल्याणकारी योजना राबविण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या दिव्यांगासाठीच्या योजनेतील अतीतीव्र निर्वाह भत्ता व वैद्यकीय अर्थसहाय्य म्हणून एक हजार रुपयाऐवजी पाचशे रुपये देण्याचे समाजकल्याण विभागाने प्रस्तावित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशीचे निष्कर्ष काय आहे आणि त्यानुसार दिव्यांगांना योजनांचा जास्तीत-जास्त लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,पुणे यांचे दि.०३.१२.२०२० अन्वये जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.७३५ नुसार निर्वाह भत्ता प्रती व्यक्ती, प्रती महिना रु.१०००/- वरुन प्रती व्यक्ती, प्रती महिना रु.५००/- करणेबाबत जिल्हा परिषदेच्या अधिकारात ठराव करण्यात आलेला आहे.

(३) सदर योजना जिल्हा परिषद स्वनिधी मधील ५ टक्के दिव्यांग निधी मधून राबविण्यात आल्यामुळे तसेच जिल्हा परिषदेच्या अधिकारात ठराव करण्यात आलेला असल्याने चौकशीचा प्रश्न उद्भवलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## रावेर व मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यात मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना राबविण्याबाबत

**(१५) * २४१५४ श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना शेतीकरीता पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने सन २०२० पासून मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेसाठी शेतकऱ्यांकडून १ लाख अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु योजनेतुन जळगांव जिल्हयातील रावेर व मुक्ताईनगर तालुका वगळण्यात आल्याने हजारो शेतकरी उक्त योजनेपासून वंचित राहिले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेमधून रावेर व मुक्ताईनगर तालुक्यातील शेतकऱ्यांना वगळण्यात आले असल्याने त्यांच्या कृषी पंपाना विदयुत पुरवठा न होऊन शेतीचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रावेर व मुक्ताईनगर तालुक्याला मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेत सामावुन घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) राज्यात शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करणे शक्य व्हावे, या हेतूने शासन निर्णय दि.१५ नोव्हेंबर, २०१८ व दि.११ सप्टेंबर, २०१९ अन्वये मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत टप्प्याटप्प्याने एक लक्ष सौर कृषीपंप आस्थापित करण्यात येणार आहेत. याकरिता सन २०१९ मध्ये ३ व ५ अश्वशक्ती सौर कृषीपंपासाठी व सन २०२० मध्ये ७.५ अश्वशक्ती सौर कृषीपंपासाठी शेतकऱ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.

(२) व (३) सदर योजनेत जळगाव जिल्हयातील रावेर तालुक्यातून १३ अर्ज व मुक्ताईनगर तालुक्यातून ४६ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी योजनेच्या निकषानुसार

अनुक्रमे ४ व २३ अर्ज पात्र झाले असून अनुक्रमे ४ व १५ लाभार्थ्यांनी मागणीपत्रानुसार लाभार्थी हिस्सा भरणा केला आहे. यापैकी अनुक्रमे १ व १४ लाभार्थ्यांनी पुरवठादाराची निवड केली आहे. त्यापैकी अनुक्रमे १ व १० जागेचा सर्व्हे पूर्ण झाला असून ६ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहेत. उर्वरित सौर कृषीपंप आस्थापित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

रावेर व मुक्ताईनगर तालुक्यात एकूण प्राप्त अर्जांपैकी अनुक्रमे ९ व २३ अर्ज अपात्र ठरविण्यात आले आहेत. अर्ज अपात्र होण्याची प्रामुख्याने ७/१२ व्यवस्थित नसणे, वीज जोडणी असणे, पाण्याची उपलब्धतता नसणे, आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्र नसणे इ. कारणे आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील समाजकार्य महाविद्यालयांतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(१६) * २०३९३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या राज्यातील ५१ समाजकार्य महाविद्यालयातील ५५९ शिक्षक व ७०८ शिक्षकेतर कर्मचारी यांचे मागील ३ महिन्यांपासून वेतन प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसी) सर्व नियम, शैक्षणिक अर्हता व वेतनश्रेणी हे इतर महाविद्यालयांप्रमाणे समाजकार्य महाविद्यालयांनाही लागू होतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उच्च शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या शिक्षण संस्थांमधील कर्मचाऱ्यांना नियमित वेतन दिले जात असून समाजकार्य विद्यालयांना वेतनापासून वंचित ठेवण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुषंगाने महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना त्यांच्या थकीत ३ महिन्यांच्या वेतनासह यापुढील मासिक वेतन नियमितपणे मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) नाही.

(४) महाराष्ट्रातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे पगार समाज सेवार्थ प्रणालीवर होतात. समाजसेवार्थ प्रणालीवर तांत्रिक अडचण असल्यामुळे वेतन देयक जनरेट करण्यास अडचण येत असल्यामुळे माहे जानेवारी, २०२१ चे वेतन तांत्रिक कारणास्तव प्रलंबित होते. तथापी सदर तांत्रीक अडचण दुर करण्यात आली असून समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महागरपालिकेला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणीपुरवठा करण्याबाबत

**(१७) * २२१३१ श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिकेला महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १२५ एम.एल.डी. पाणी मंजूर झाले असून गत काही महिन्यांपासून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून मिरा भाईंदर महानगरपालिकेला पूर्ण क्षमतेने पाणी पुरवठा झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी उपाययोजना करण्यासंदर्भात उद्योग मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान बैठक आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांनी पत्र दि.०६/०७/२०१९ अन्वये सन २०१९ च्या पावसाळी कालावधी पुरते मिरा-भाईंदर महानगरपालिकेला तात्पुरत्या स्वरुपात २५ दललि/दिन अतिरिक्त पाणी उचलण्यास मान्यता देण्यात येत असल्याचे महामंडळाला कळविल्यानुसार दि.२२/०८/२०१९ पासून मिरा भाईंदर महानगरपालिकेस यापुर्वी होत असलेल्या ९० दललि/दिन पाणी पुरवठयात २५ दललि/दिन इतकी वाढ करुन दि. २२/०८/२०१९ पासून मिरा-भाईंदर महानगरपालिकेस एकूण ११५ दललि/दिन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला. तथापि, वाढीव पाणी पुरवठयामुळे म.औ.वि.महामंडळाच्या बारवी वहन व्यवस्थेवर होणारे विपरित परिणाम विचारात घेऊन सन २०१९ च्या पावसाळयापुरते मंजूर २५ दललि/दिन पाणी पुरवठयात कपात करुन जून २०२० पासून मिरा भाईंदर महानगरपालिकेस सुमारे १०० दललि/दिन इतका पाणी पुरवठा करण्यात आला. पुढे ऑक्टोबर २०२० पासून १०५ दललि/दिन इतका पाणी पुरवठा सुरु आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर बैठकीमध्ये मिरा - भाईंदर महानगरपालिकेची पाण्याची निकड विचारात घेऊन जास्तीत जास्त पाणी पुरवठा कसा करता येईल याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेस अतिरिक्त पाणी पुरवठा केल्यामुळे वागळे औद्योगिक क्षेत्र व ठाण्यातील इतर पाणी ग्राहकांचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी महामंडळामार्फत साकेत येथे ईनलाईन बुस्टर पंपींग स्टेशन उभारण्यासाठीच्या कामाचे कार्यादेश निर्गमित केलेले आहेत. या कामासाठी संरचना व आराखडे आय.आय.टी., मुंबई या संस्थेकडे तपासणीसाठी सादर केलेले आहेत. आय.आय.टी., मुंबई यांचे सहमतीनंतर पंपींग स्टेशनच्या उभारणीच्या कामाला लवकरच सुरुवात होणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यामध्ये प्रत्यक्षात वृक्षारोपण न करता फक्त कागदोपत्रीच दर्शवुन केलेला गैरव्यवहार

**(१८) * २०४८१ श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यामध्ये वृक्षलागवडीचे मोठे उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात वृक्षारोपण न करता कागदोपत्री नोंदणी करून लाखो रुपयांची देयके अदा करण्यात आली असल्याची बाब दिनांक १ ऑगस्ट, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मलकापूर व नांदुरा तालुक्यात दर्शविण्यात आलेल्या वृक्ष लागवड व रोपणाच्या २०% वृक्ष व रोपे अस्तिवात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वृक्षारोपण न करता लाखो रुपयांची देयके अदा करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे :** (१) सन २०१७ ते २०१९ हया कालावधीत राज्यात ५० कोटी वृक्ष लागवडीची मोहिम राबवण्यात आली. बुलढाणा जिल्हयाकरिता ६,०४,५५४१ उद्दिष्ट होते व प्रत्यक्षात ६,१८,३५९४ रोपे लागवड साध्य झाले आहे.

(२) व (३) मलकापूर व नांदुरा तालुक्यात सन २०१७ ते २०१९ या कालावधीत १,९५,७३६ इतकी वृक्ष लागवड करण्यात आलेली असुन, त्यापैकी १,५५,३७२ रोपे जिवंत आहेत. जिवंत रोपांची टक्केवारी ७९% इतकी असल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुरखेडा व कोरची (जि.गडचिरोली) तालुक्यात नविन १३२ केव्ही उपकेंद्र सुरु करण्याबाबत

**(१९) * २३९७३ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरखेडा व कोरची (जि.गडचिरोली) या तालुक्यांमध्ये भंडारा जिल्हयातील लाखांदुर या लांब अंतरावरील १३२ केव्ही उपकेंद्रातुन वीज पुरवठा करण्यात येत असल्याने पुरेशा दाबाने वीज उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुरखेडा व कोरची तालुक्यातील वीज समस्या दुर करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास उर्जा मंत्री यांच्याकडे कुरखेडा येथे नविन १३२ केव्ही उपकेंद्र सुरु करण्याची निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे अंशत: खरे आहे. कुरखेडा व कोरची (जि. गडचिरोली) या तालुक्यांमध्ये भंडारा जिल्हयातील लाखांदुर या लांब अंतरावरील १३२ के.व्ही. उपकेंद्रातून वीज पूरवठा करण्यात येत असल्याने ३३/११ कोरची उपकेंद्रातून निघणाऱ्या ११ के.व्ही. वाहिन्या वरील शेवटच्या काही गावांना फक्त शेतीच्या रब्बी हंगामात वाढ झालेल्या भारामूळे साधारणत: ऑक्टोबर-नोव्हेंबर या महिन्यामध्ये कमी दाबाने वीज पूरवठा होत असतो.

(२) हे खरे आहे.

(३) सदर उपकेंद्राची तांत्रिक व आर्थिक दृष्टया तपासणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वर्धा जिल्हयातील समाजकल्याण कार्यालयाच्या शिष्यवृत्ती खात्यातून भारत सरकारच्या मेट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची रक्कम परस्पर काढण्यात आल्याबाबत

**(२०) * २१४२९ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जातीतील विद्यार्थी उच्च शिक्षणात आर्थिक अडचणीमुळे मागे पडू नयेत म्हणून देण्यात येणाऱ्या भारत सरकारच्या मेट्रिकोत्तर शिष्यवृत्तीची सुमारे ७२ लाख ८६ हजार २२४ रुपये इतकी रक्कम वर्धा जिल्हयातील समाजकल्याण कार्यालयाच्या शिष्यवृत्ती खात्यातून परस्पर काढण्यात आली असल्याची बाब दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) अशत: खरे आहे.
(२) चौकशी अहवालात अधिकारी / कर्मचारी वा महाविद्यालय दोषी आढळल्यास संबंधिताविरूध्द नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आदिवासी प्रकल्पांमध्ये कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत योजना राबविताना झालेला अपहार

**(२१) * २०४१० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागाच्या सात पैकी पाच प्रकल्पात कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमात सुमारे १ कोटी ९५ लाख रुपयांचा अपहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद येथील श्रीमंत महाराज महादेवराव सिंधीयाजी फाउंडेशन, जाणता राजा चॅरिटेबल ट्रस्ट आणि परभणी जिल्ह्यातील लोहारा येथील क्रांतिज्योती प्रमिलाजी चव्हाण महिला मंडळ या संस्थेने आदिवासी युवक व युवतींना दिलेले प्रशिक्षण केवळ कागदोपत्री असून प्रशिक्षणार्थींना दिलेली प्रमाणपत्रे सुद्धा बनावट होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जाणता राजा चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेवर औरंगाबाद आदिवासी प्रकल्प कार्यालयामध्ये NB (न्यूक्लियस बजेट) योजना राबविताना त्याचप्रमाणे कौशल्य विकास योजना राबविताना अपहार केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून पांढरकवडा प्रकल्पामध्ये योजना राबवितांना मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याने काळ्या यादीत टाकण्याचे काम सुरु असतांनाही उक्त संस्थेस औरंगाबाद प्रकल्प, नाशिक प्रकल्प व महाराष्ट्रातील इतर प्रकल्पामध्ये कामे देण्यात आली असल्याचे माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने कौशल्य विकास प्रशिक्षणांतर्गत केलेल्या अपहाराप्रकरणी दोषी संस्थांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या स्तरावरुन केलेल्या प्राथमिक चौकशीचा अहवाल दि.०३.०९.२०२० रोजी आयुक्तालय व शासनास सादर करण्यात आलेला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) अपर आयुक्त, अमरावती यांच्याकडून प्राप्त प्राथमिक चौकशी अहवालास अनुसरून सर्व संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी तसेच संस्थांविरूद्ध फौजदारी कारवाई करण्यापूर्वी नैसर्गिक न्यायाच्या तत्वाप्रमाणे संस्थांना त्यांची बाजू मांडण्याकरिता सुनावणी घेण्याबाबत अपर आयुक्त, नागपूर यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार अपर आयुक्त, नागपूर यांच्या स्तरावरून सुनावणी घेण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्हयात ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत मंजूर झालेल्या कामांबाबत

**(२२) * २१२२२ श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयात ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत सन २०१८-१९ व सन २०१९-२० या वर्षातील जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी घटक कार्यक्रम) अंतर्गत मंजूर झालेल्या ४३ कामांचे आदेश रद्द करावेत अशी मागणी लोकप्रतिनिधींनी आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे दिनांक १७ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामे जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच लोकप्रतिनिधींनी शिफारस न करता ठेकेदारांच्या सांगण्यावरुन मंजूर करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी यांनी ठेकेदाराच्या सांगण्यावरुन परस्पर ४३ कामे मंजूर करुन शासकीय नियमांचे उल्लंघन केल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) हे खरे आहे.

(२) सदरची कामे ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम या योजनेतंर्गत करण्याबाबत मा.पालकमंत्री, धुळे यांनी शिफारस केली होती व त्यानुसार प्रकल्प अधिकारी, धुळे यांनी सदर कामे ही विभागाच्या दि.१६.१२.२००९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रस्तावित केली होती.

(३) हे खरे आहे.

(४) धुळे जिल्ह्यात ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत सन २०१९-२० या वर्षातील जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी घटक कार्यक्रम) अंतर्गत मंजूर झालेली ४३ कामे शासन निर्णयात दिलेल्या निर्देशानुसार करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोसरी (जि.पुणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औषधी वृक्ष उद्यानाच्या जागेची विक्री रद्द करण्याबाबत

**(२३) * २१५१४ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोसरी (जि.पुणे) येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिसरातील राखीव असलेली मोकळी १ एकर जागा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला वृक्ष लागवडी करिता व आयुर्वेदिक वृक्षांची जोपासना करण्यासाठी देण्यात आली होती, सदर जागा २१ वर्षाच्या कराराने नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (NIMA) या संस्थेस औषधी उद्यानाकरिता दिनांक २७ फेब्रुवारी २००८ रोजी वा त्यासुमारास देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर NIMA संस्थेच्या वतीने मागील १२ वर्षापासून ४५० आयुर्वेदिक वृक्षांची लागवड केली असून, भोसरी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व महानगरपालिका प्रशासनाने सदर औषधी उद्यानाची जागा परस्पररित्या व्यावसायिक जागेत रुपांतरीत करुन विक्री केल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शहरातील वनीकरण अबाधित राहावे व आरोग्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या औषधी उद्यानाची जागा व्यावसायिक जागेत रुपांतरीत करून विक्री करण्याचा निर्णय मागे घेण्याच्या विरोधात नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशनच्या वतीने निवेदनाद्वारे मागणी केली असून, सदर औषधी उद्यानाच्या जागेचे एम.आय.डी.सी व महानगरपालिका यांनी परस्पर विक्रीचा निर्णय मागे न घेतल्यास आंदोलन करण्याचा इशारा संस्थेच्या डॉक्टरांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने २१ वर्षे कराराची मुदत न संपता परस्पर भूखंड विक्रीस मान्यता देण्याऱ्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी व महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन झालेली विक्री रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) अंशत: खरे आहे.

पिंपरी औद्योगिक क्षेत्रातील खुली जागा क्र. ४३, क्षेत्र ४०४० चौ. मी. वृक्ष लागवडीकरीता दिनांक १०/५/१९८५ रोजी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला हस्तांतरीत केलेली होती. परंतु पिंपरी-चिंचवड महानगरपलिकेने वृक्ष लागवड न केल्यामुळे दिनांक २२/६/२०१६ रोजी पंचनाम्याने महामंडळाने परत घेतली आहे.

(२) हे खरे नाही.

पिंपरी औद्योगिक क्षेत्रातील खुली जागा क्र. ४३, क्षेत्र ४०४० चौ. मी. वृक्ष लागवडीकरीता दिनांक १०/५/१९८५ रोजी पिंपरी-चिंचवड महानगरपलिकेला हस्तांतरीत केली होती. मात्र पिंपरी-चिंचवड महापलिकेने वृक्ष लागवड न केल्यामुळे महामंडळाने परत घेतलेली आहे. सदर खुली जागेवर स्थळपाहणी केली असता अंदाजे १४० ते १५० पर्यंत लावलेली रोपटे निदर्शनास आली. महामंडळाच्या दिनांक ९/१/२०१९ रोजीच्या किरकोळ बदल समितीच्या बैठकीत पिंपरी आदयोगिक क्षेत्रातील खुली जागा क्र. ४३ क्षेत्र ४०४० चौ.मी. चे औद्योगिक भूखंडात रुपांतरण करून महामंडळाच्या धोरणाप्रमाणे मे. मेटापो इंजिनिअर्स प्रा. लि. यांना भूखंड बदलून दिला आहे.

(३) मे. नॅशनल इंटिग्रेटेड मेडीकल असोसिएशन यांचेकडून निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) महामंडळाच्या धोरणाप्रमाणे सदर भुखंड औद्योगिक भूखंडात रुपांतरीत करण्यात आला आहे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यात नव्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ वसाहत स्थापन करण्याबाबत

**(२४) * २३८१८ ॲड.शहाजीबापू पाटील (सांगोले) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यात नव्याने अत्याधुनिक औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सांगोला हा तालुका आकाराने मोठा असून तालुक्यातून दोन मोठे राष्ट्रीय महामार्ग व अनेक राज्यमार्ग जात असल्यामुळे अत्याधुनिक औद्योगिक वसाहत स्थापन करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, तालुक्यात नव्याने अत्याधुनिक औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याबाबत सुयोग्य जागा व शेतकऱ्यांची संमती याबाबत पडताळणी करण्याची महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## पालम (जि.परभणी) शहरासह ग्रामीण भागात गंगाखेड येथून वीज पुरवठा करणाऱ्या वीज तारा जीर्ण झाल्याबाबत

**(२५) * २३१५५ श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालम (जि.परभणी) शहरासह ग्रामीण भागात गंगाखेड येथून वीज पुरवठा करणाऱ्या वीज तारांना सुमारे ४० वर्षे झाली असून वीज तारा जीर्ण झाल्याने वीजेचा अतिरिक्त भार येताच तारा तुटुन वीज पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने शेतकऱ्यांना व ग्रामस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जीर्ण झालेल्या वीज तारा बदलून वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) सदर वाहिनी ४० वर्षे जुनी आहे. परंतु सदर वाहिनीचा वीज पुरवठा वारंवार खंडीत होत नाही.

(२) पालम, जि.परभणी शहरासह ग्रामीण भागात १३२/३३ के.व्ही.गंगाखेड येथून ३३ के.व्ही.वाहिनीद्वारे वीज पुरवठा करण्यात येतो. या वाहिनीवर एकूण ६ उपकेंद्र आहेत. सदर वाहिनी ४० वर्षे जुनी आहे. रब्बी हंगामामध्ये शेतीपंपाचा लोड वाढत असल्याकारणाने सदर वाहिनीवर ३९० Amp इतका विद्युत भार येतो. त्यामुळे विद्युत वाहिनी अतिभारीत होऊन वीज पुरवठा खंडित होत होता. परंतु माहे डिसेंबर, २०२० मध्ये सदर वाहिनीवरील विद्युत भार इतर ३३ के.व्ही वाहिनीवरती टाकल्यामुळे सदर वाहिनीचा वीज भार हा ३५० Amp इतका कमी झाला. त्यामुळे सद्यःस्थितीत वीज पुरवठा मोठ्या प्रमाणात सुरळीत झाला आहे.

(३) होय, सदर वाहिनीवरील विद्युत भार कायमस्वरुपी कमी करण्याकरिता तातडीने ३३ के.व्ही सारंगी ते पेठशिवणी या नवीन वाहिनीचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अपंगाच्या विशेष निवासी/अनिवासी शाळांना १०० टक्के अनुदान तत्वावर मान्यता मिळण्याबाबत

**(२६) * २१६५१ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील 'अ' श्रेणीतील १२३ विना अनुदान तत्वावरील अपंगाच्या विशेष निवासी, अनिवासी शाळा व कर्मशाळांना दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार १०० टक्के अनुदान व दिनांक ६ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार ५० टक्के अनुदानावर पदनिर्मितीस शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत १६ वर्षांपासून मतीमंद विद्यार्थ्यांसाठी अविरत सेवेत असलेले कर्मचारी वेतन लाभापासून वंचित असल्याने त्यांना ५० टक्के अनुदानाऐवजी १०० टक्के अनुदान देण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १९ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर 'अ' श्रेणीतील १२३ अपंगाच्या विशेष निवासी शाळांना ५० टक्क्यांवरून १०० टक्के अनुदान देण्यासंदर्भात व गत १६ वर्षांपासून मतीमंद विद्यार्थ्यांच्या शाळेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे प्रलंबित असलेले वेतनलाभ, शाळांचे सेवार्थ प्रणाली प्रस्ताव मंजूर करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय.

(२) होय.

(३) आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांना "अ" श्रेणीतील १२३ अपंगांच्या विशेष निवासी /अनिवासी शाळा/कर्मशाळांची आवश्यक ती तपासणी करुन अनुज्ञेय शाळा/कर्मशाळांचा ५० टक्कयांवरुन १०० टक्के अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने आयुक्तालय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) वन विभागाने सन २०१९-२० मध्ये केलेल्या विविध कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२७) * २२७७६ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे वन विभागांतर्गत येणाऱ्या शहापूर (जि.ठाणे) वन विभागाने सन २०१९-२० मध्ये एकूण ६ वन परीक्षेत्रातील मृद जलसंधारणांतर्गत सिमेंट काँक्रिट

बंधारे, वन तलाव, सलग समतर चर, दगडी नाला बांध, गॅबियान स्ट्रक्चर बंधारे, चेकडॅम इत्यादी कामांमध्ये बनावट देयके सादर करुन गैरव्यवहार केल्याचे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित वन अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे :** (१), (२) व (३) शहापूर वन विभागांतर्गत सन २०१९-२० मध्ये मृद जलसंधारण अंतर्गत ६ वन परिक्षेत्रामध्ये सिमेंट कॉंक्रिट बंधारे, वन तलाव, सलग समतर चर, दगडी नालाबांध, गॅबियन स्ट्रक्चर बंधारे, चेकडॅम कामे अंदाजपत्रकीय मोजमापाप्रमाणे करण्यात आलेली आहे. सदर कामांची संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी, सहा. वनसंरक्षक यांचेमार्फत नियमित तपासणी करण्यात आलेली असुन, कामावरील गैरव्यवहार झाला असल्याचे सदर तपासणीत निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्तीचा लाभ मिळणेबाबत

**(२८) * २४१२० श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी राज्य शासनाच्या राजर्षी शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती योजनेमार्फत प्रतिवर्षी ७५ विद्यार्थ्यांना विदेशात शिक्षणासाठी पाठविले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या नॅशनल ओव्हरसीज स्कॉलरशिप या योजनेमार्फतही अशा विद्यार्थ्यांना विदेशात शिक्षणासाठी पाठवले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन्ही योजनांमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारच्या योजनेची निवड केलेली असते त्यांच्या राज्य शासनाच्या योजनेतील रिक्त झालेल्या जागांवर प्रतिक्षा सूचीतील विद्यार्थ्यांची निवड केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यमान वर्षीही ७५ पैकी २५ विद्यार्थ्यांची केंद्र व राज्य अशा दोन्ही योजनांसाठी निवड झाली असून त्यातील सुमारे १३ विद्यार्थी केंद्र शासनाच्या योजनेचा स्वीकार करण्याची शक्यता असल्याने तसे झाल्यास राज्य योजनेमध्ये त्यांच्या जागा रिक्त राहणार आहेत, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, अनुसूचित जातीच्या अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा म्हणून अशा प्रकारे केंद्राच्या योजनेचा लाभ घेतल्यामुळे रिक्त होणाऱ्या राज्य योजनेतील जागांवर प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची निवड करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अशंत खरे आहे. सन २०२०-२१ सालासाठी राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शा.नि. दिनांक २९.९.२०२० व ५.११.२०२० अन्वये एकून ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आलेली असून, आजपर्यंत आयुक्त, समाजकल्याण यांचेमार्फत प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने विविध कारणास्तव केवळ ७ विद्यार्थ्यांची निवड रद्द करण्यात आलेली आहे

(५) राज्यशासनाच्या राजर्षी शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पुर्णत: ७५ जागा भरण्याच्या दृष्टीने कार्यवाही प्रस्तावीत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---------------

## डोंबिवली (जि.ठाणे) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पुरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्याबाबत

**(२९) * २१९६७ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कल्याण, डोंबिवली, दिवा तसेच त्या परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणीपुरवठा करण्यात येत असून, एम.आय.डी.सीच्या दुर्लक्षामुळे, पाणी पुरवठ्यातील कामात असलेले दोष आणि निष्कृष्ट दर्जाच्या कामांमुळे वारंवार पाईपलाईन फुटत असून, पाणीपुरवठा खंडीत होत असून स्थानिक ग्रामस्थांना वारंवार समस्यांना सामोरे जावे लागत आहे, तसेच कल्याण-शिळफाटा मार्गावर पाणी साचून वाहतूक कोंडी निर्माण होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वारंवार पाईपलाईन फुटून पाणी वाया जात असल्याने तसेच एम.आय.डी.सी.कडून पाईपलाईन दुरुस्ती व देखभालीचे काम योग्यरित्या होत नसल्याने स्थानिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न उद्भवत असून उक्त प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांवर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच पाणीपुरवठा योजनेतील सर्व दोष दूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास डोंबिवली येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई** : (१) सन १९६८ व १९९८ साली कल्याण- शिळ रस्त्याला समांतर म.औ.वि. कडून १७७२ मि.मी. व्यासाच्या लोखंडी जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत.

सदरील जलवाहिन्या ४० ते ५० वर्षे जुन्या झाल्याने व कालांतराने जलवाहिन्यांच्या आवरणाची जाडी कमी झाल्याने जलवाहिनी फुटण्याचे प्रकार झाले होते.

महामंडळाने सदरील जुन्या झालेल्या जलवाहिन्या टप्प्याटप्प्याने बदलविण्याचे काम होती घेतले आहे. त्यामुळे म.औ.वि.म. च्या दुर्लक्षामुळे पाणी पुरवठ्यातील कामात असेलेले दोष व निष्कृष्ट दर्जाच्या कामांमुळे पाईपलाईन फुटते हे खरे नाही. कल्याण शीळ लगत झालेल्या विकास कामांमुळे व शहरीकरणामुळे पाणी परिसरात साचून पाण्याचा विसर्ग होण्यास वेळ लागत आहे. त्यामुळे कल्याण-शीळफाटा मार्गावर पाणी साठून वाहतुकीची काही काळ कोंडी होते हे अंशत: खरे आहे. त्याचप्रमाणे सद्य:स्थितीत रस्त्याच्या क्राँक्रीटीकरण कामामुळे देखील वाहतुकीस अडथळे व कोंडी होत आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे

सन्माननिय सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, (कल्याण ग्रामिण) यांचे दि. ०३/११/२०२० रोजीचे पत्र महामंडळास प्राप्त झाले आहे. सदरील जलवाहिन्या ४० ते ५० वर्षे जुन्या असल्याने व जलवाहिन्यांची आवरणाची जाडी कमी झाल्याने म.औ.वि. महामंडळाने सदर जलवाहिन्या टप्प्याटप्प्याने बदलण्याचे काम हाती घेतले आहे व सदर काम प्रगती पथावर आहे. सदर जलवाहिनी मजबुत करण्यासाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून क्र. डी-४५७२८, दि.२४/१२/२०२० च्या पत्रान्वये सन्माननिय सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, (कल्याण ग्रामिण) यांना अवगत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागामार्फत कायापालट योजनेंतर्गत गाद्या खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३०) * २०९४७ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागामार्फत कायापालट योजनेअंतर्गत गेल्या दोन वर्षात आश्रमशाळा व वसतिगृहांसाठी फर्निचर व गादया खरेदी प्रकरणी शासनाकडे करण्यात आलेल्या तक्रारीनुसार शासनाने सदर खरेदीबाबत स्थगिती आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असताना याच कायापालट योजनेअंतर्गत राज्यातील चारही अप्पर विकास आयुक्त कार्यालयांनी ५० कोटी रुपये रकमेच्या गादया खरेदी केल्या असल्याचे दिनांक ५ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१८ मध्ये २५०० रुपये प्रति गादी या दराने खरेदी केलेल्या गादीसाठी सन २०१९ मध्ये अधिकाऱ्यांशी संगनमत करुन यंत्रमाग महामंडळाकडून ५ हजार ७९६ इतक्या दुप्पट दराने गादया खरेदी करण्यात आल्याचे व त्यासाठी १५ कोटी २३ लाख ३५ हजार रुपये इतकी रक्कम अदा करण्यात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याबाबत चौकशी करुन संबंधिताविरुध्द कारवाई करण्याबाबत आदिवासी विकास मंत्री महोदयांनी, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग व नाशिक, अमरावती, नागपूर व ठाणे येथील चारही अप्पर आयुक्त, आदिवासी विकास यांना आदेश दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त आदेशानुसार शासनाने चौकशी करुन खरेदी प्रकरणी झालेल्या आर्थिक घोटाळयाबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) दि.२२.०५.२०२० च्या आदेशान्वये गादी व उशी खरेदी प्रक्रियेस स्थगिती दिली होती. तद्नंतर दिनांक ३१ डिसेंबर, २०२० च्या आदेशान्वये खरेदी प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.

(२) खरेदी प्रक्रियेस स्थगिती देण्यापुर्वी रू.१५.२३ कोटी रक्कमेच्या गादी व उशी यांचा पुरवठा झाल्याचे निर्दशनास आले आहे. परंतु, अद्याप कोणत्याही प्रकारची देयके अदा करण्यात आलेली नाहीत.

(३) सन २०१७-१८ मध्ये ई-निविदेत प्राप्त गादी साहित्याचे स्पेसिफीकेशन तसेच सन २०१९-२० मधील गादी साहित्याचे स्पेसिफीकेशनमध्ये गुणात्मक दर्जा उंचावण्यात आलेला असल्याने गादी खरेदीच्या दरांमध्ये तफावत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पुणे व सोलापूर जिल्हयात भेसळयुक्त ताडीची विक्री होत असल्याबाबत

**(३१) * २०९६९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील ताडी विक्रेत्यांकडून ताडीमध्ये क्लोरस हायड्रेट (CH) मिसळून ताडी विक्री केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून, ताडीमध्ये क्लोरल हायड्रेट हा पदार्थ मिसळला जात असून भेसळयुक्त ताडी सेवनाने मानवी प्रकृतीवर घातक परिणाम होत असल्याने ताडी विक्रीची अनुज्ञप्ती कायमस्वरुपी रद्द करुन अनुज्ञप्तीधारकांविरुध्द नियमानुसार गुन्हा नोंद करुन फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कुंभारी (जि.सोलापूर) मध्ये माळरानावर दररोज ५०० लीटर विषारी ताडी तयार होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून, ताडी केंद्रांना बंदी असूनसुद्धा विषारी ताडी तयार करणाऱ्या व्यक्तींकडे प्रशासन दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) पुणे जिल्हयात अवैध ताडी उत्पादन / विक्रीबाबत जानेवारी, २०२१ ते दि.७.२.२०२१ पर्यंत एकूण ३६ गुन्हे नोंद करण्यात आले असून, ३१८१ लिटर ताडी जप्त करण्यात आली असून, रु.७४,८५०/- इतक्या किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ च्या कलम ९३ अन्वये अवैध ताडी विक्री करणाऱ्या १५ सराईत इसमांकडून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित प्राधिकरणाकडे पाठविण्यात

आले आहेत. पुणे जिल्हयामध्ये सन २०२०-२१ या ताडी वर्षाकरीता एकही सरकारमान्य ताडी अनुज्ञप्ती कार्यरत नाही. परंतु अवैध ताडी विक्री करणाऱ्या इसमांवर उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

अवैध ताडी उत्पादन / विक्रीच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोमवाडा बोरगांव (ता.लाखनी, जि.भंडारा) मार्गावरील शासकीय जागेवरील सागवान वृक्षांची अवैध तोड होत असल्याबाबत

**(३२) * २०८७७ श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोमवाडा बोरगांव (ता.लाखनी, जि.भंडारा) येथील शासकीय जागेवर असलेल्या सागवान वृक्षांची मोठ्या प्रमाणात तोड होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी एका वरिष्ठ अधिकाऱ्याचे नातेवाईक लाकुड ठेकेदाराचे काम करीत असल्याने सोमवाडा बोरगाव मार्गावरील मौल्यवान सागवानच्या अवैध तोडीचे प्रकरण संबधित अधिकाऱ्यामार्फत दुर्लक्षित केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधित अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे :** (१) सोमवाडा बोरगांव (ता.लाखनी, जि.भंडारा) मध्ये माहे डिसेंबर, २०२० मध्ये शासकीय जागेवरील वृक्षांची अवैध तोड झाली नसून खाजगी गटामध्ये अवैध वृक्षतोड झालेली आहे.

खाजगी गटामधील ४ सागवान झाडे मालकीचे असून सदर झाडे विनापरवाना तोडण्यात आल्यामुळे श्री.नाजूकराम शितकुरा निर्वान रा.बोरगाव यांचेवर दिनांक २३.१२.२०२० रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आला असून माल जप्त करण्यात आला आहे.

तसेच बोरगांव ते सोमवाडा रस्त्यावर २ सागवान झाडे तोडण्यात आली असून सदर झाडे तोडली असल्यामुळे श्री.गणेश सोमाजी निर्वान रा.बोरगाव यांचेवर दिनांक १.१.२०२१ रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आला असून माल जप्त करण्यात आलेला आहे.

(२) व (३) वरील दोन्ही व्यक्ती हे शेतकरी असून ते वनाधिकाऱ्याचे नातेवाईक नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औसा (जि.लातूर) तालुक्यात पाणीपुरवठा योजनेसाठी स्वतंत्र रोहित्र बसविण्याबाबत

**(३३) * २४१०६ श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) तालुक्यातील गांवाना पाणीपुरवठा योजनेसाठी स्वतंत्र रोहित्र नसल्याने तसेच शेतीपंपाचा अतिरिक्त भार मोठ्या प्रमाणात सदर रोहित्रावर असल्याने पाणीपुरवठा योजनेच्या विदयुत पंपास कमी दाबाने विदयुत पुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतीपंपाचा अतिरिक्त भार सदर रोहित्रावर येत असल्याने वांरवार वीज पुरवठा खंडीत होवून नागरिकांना पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औसा तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेसाठी स्वतंत्र रोहित्र बसवण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास पालकमंत्री, लातूर यांच्याकडे निवेदनाद्वारे तसेच जिल्हा वार्षिक

योजना आढावा बैठकीत कार्यकारी अभियंता महावितरण मंडळ कार्यालय, लातूर यांच्याकडे मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने पाणीपुरवठा योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी स्वतंत्र रोहित्र बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजनेसाठी स्वतंत्र रोहित्र स्थापन करण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे, सदर निधी मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) व (२) औसा तालुक्यातील काही गावांना पाणी पुरवठा योजनेसाठी स्वतंत्र रोहित्र नसल्याने तसेच शेतीपंपाचा अतिरिक्त भार मोठया प्रमाणावर आल्यामुळे पाणी पुरवठा योजनेच्या विद्युत पंपास काही वेळेस कमी दाबाने विद्युत पुरवठा होतो. त्यामुळे विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची काही प्रमाणात गैरसोय होत असते.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) ज्या गावामध्ये सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेतील विद्युत पंपाच्या विद्युत पुरवठ्यात अडचणी आल्याचे निदर्शनास आले आहे त्या ठिकाणी पाणी पुरवठयासाठी स्वतंत्र रोहित्राचा रु.५० दशलक्ष इतक्या रक्कमेचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सामान्य विकास सन २०२१-२२ अंतर्गत निधीकरिता जिल्हा नियोजन समितीकडे सादर केला आहे. यामध्ये १) नागरसोगा २) जोगन चिंचोळी ३) जवळगा (प) ४) माळकोंडजी ५) खरोसा ६) बुधोडा ७) मोगरगा ८) दावतपूर ९) सारोळा १०) लामजना ११) याकतपूर १२) किनीनवरे या गावांचा समावेश करण्यात आला आहे.

-----------------

## सातारा जिल्हयातील रमाई आवास योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत

**(३४) * २०५५७ श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीतील गरीब कुटुंबांच्या निवाऱ्यासाठी रमाई आवास योजना शासनाने अंमलात आणलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना १ लाख २० हजार रुपये व शौचालयासाठी १२ हजार रुपये असे जवळपास दीड लाख रुपये अनुदान शासनाकडून दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१९-२०२० या वर्षात सातारा जिल्हयात रमाई आवास योजनेंतर्गत १७३० घरकुलांना शासनाने मंजूरी दिल्यानंतर लाभार्थ्यांनी घरकुलांची कामे सुरु करुनही गेल्या आठ महिन्यांपासून लाभार्थ्यांना शासनाकडून अनुदान देण्यात आले नसल्यामुळे सदरची कामे अपुर्णावस्थेत राहिली असल्याचे दिनांक २१ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अनुदानाची एकूण रक्कम सुमारे २० कोटी रुपये इतकी असून त्याबाबत जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत तसा ठराव संमत केल्यानंतर, सातारा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष यांनी सदर योजनेंतर्गत प्रलंबित अनुदान मिळण्याबाबत पालकमंत्री, सातारा जिल्हा तसेच प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग यांचेकडे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार लाभार्थ्यांना थकीत असलेले अनुदान सत्वर देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) सन २०१९-२० या आर्थिक वर्षात सातारा जिल्हयास रमाई आवास योजनेंतर्गत १७३० घरकुलांना मंजूरी दिलेली आहे. त्यानुषंगाने दि.१८.१.२०२१ रोजी सन २०१९-२० मधील १७३० घरकुलांना अनुदान उपलब्ध करून देण्यात आले आहे. सद्यस्थितीत ८०४ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आलेला आहे. उर्वरित लाभार्थ्यांना अनुदानाचे हप्ते वितरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नायगाव (जि.नांदेड) येथे कृषी पंपाना केबलव्दारे वीज पुरवठा केल्याबाबत

**(३५) * २३९२४ श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीमध्ये सन २०११-२०१५ या कालावधीत कृषीपंपाना विदयुत पुरवठ्याकरीता लागणाऱ्या लघुदाब वाहिन्या, रोहित्रे तसेच उच्च दाब वाहिन्या यांची कामे न करता केबलव्दारे विदयुत पुरवठा करुन वीज देयके आकारण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नायगाव (जि.नांदेड) तसेच राज्यात अशा किती शेतीपंपांना केबलव्दारे वीज पुरवठा करण्यात येत असून वीज देयके आकारण्यात येत आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) नांदेड परिमंडळामध्ये सन २०११-१५ या कालावधीमध्ये एकूण ४७,७२९ कृषीपंपाना वीज पुरवठा देण्यात आला. त्यापैकी २६,१४८ कृषीपंपाना लागणाऱ्या पायाभूत सुविधा उभारुन वीज पुरवठा देण्यात आला आहे.

उर्वरित २१,५८१ कृषीपंपाना नवीन रोहित्र, उच्चदाब वाहिनी व लघुदाब वाहिनी इत्यादी पायाभूत सुविधा न उभारता अस्तित्वात असलेल्या पायाभूत सुविधावरुन केबलद्वारे महावितरण आपल्या दारी या योजनेअंतर्गत वीज पुरवठा देण्यात आला असून त्यापैकी २,२२३ कृषीपंप धारकांचे पायाभूत विद्युत प्रणालीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(२) नायगाव (जि.नांदेड) तालुक्यात एकूण १२९ कृषीपंपाना केबलद्वारे वीज पुरवठा करण्यात येत आहे व नायगाव उपविभागात सन २०११-२०१५ या कालावधीत एकूण १०९६ कृषीपंप ग्राहकांना नवीन विद्युत पुरवठ्यापोटी वीज देयके आकारण्यात आलेली आहेत. तसेच राज्यामध्ये १,२९,६५४ कृषीपंपाना "महावितरण आपल्या दारी" योजनेअंतर्गत केबलद्वारे वीज पुरवठा देण्यात आला आहे.

(३) राज्यात ३१ मार्च, २०१८ नंतर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंपाना व मंजुरीकरिता प्रलंबित असलेल्या कृषीपंपाना वीज जोडणी देण्याकरिता शासनाने कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२०, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१२१/ऊर्जा-५, दिनांक १८.१२.२०२० अन्वये मंजूर केले आहे. सदर धोरणाअंतर्गत यापूर्वी "महावितरण आपल्या दारी" योजनेअंतर्गत वीज जोडणी देण्यात आलेल्या व आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नसलेल्या ग्राहकांना वीज बिलातून परताव्याच्या माध्यमातून आवश्यक पायाभूत सुविधा उभारणीचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागोठणे (जि.रायगड) येथील प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना नोकऱ्या तसेच नापिक झालेल्या शेतीचा मोबदला देण्याबाबत

**(३६) * २०४३१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या आयपीएसीएल व सध्याच्या रिलायन्स कंपनीचा प्रकल्प उभारण्यासाठी नागोठणे (जि.रायगड) येथील हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी ३६ वर्षापूर्वी संपादीत करण्यात आल्या असून, सदर जमिनी संपादीत करतांना सर्व भूमिपुत्रांना नोकऱ्या देण्याचा करार कंपनी व्यवस्थापनाने शेतकऱ्यांशी करुनही अद्याप त्यांना नोकऱ्या देण्यात आल्या नसल्याचे दिनांक १ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान सुरु केलेल्या आंदोलनामध्ये एका प्रकल्पग्रस्त शेतकऱ्याचा मृत्यु होऊन अन्य दोन वृध्द शेतकऱ्यांना अर्धांगवायुचा झटका आल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील आवसारे, बिर्दोले, कोदिवले, तलवाडे, पिंपळोली व वंजारपाडा या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी रिलायन्स इथेन या कंपनीने दहेज (गुजरात) ते नागोठणे गॅस पाईपलाईन प्रकल्पासाठी अटी व शर्तीच्या अधीन राहून गत २ ते ३ वर्षापूर्वी अधिग्रहित केल्या असून, उक्त अधिग्रहित केलेल्या जमिनीतून गॅस पाईपलाईन गेल्याने शेत जमीन नापिक झाल्याने त्याचा योग्य तो मोबदला बहुतांशी शेतकऱ्यांना मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना नोकऱ्या देण्याबाबत तसेच नापिक झालेल्या शेतीचा योग्य मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर भूसंपादन करताना प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना प्राधान्यक्रम दाखले देण्यात आले आहेत. तसेच दि.२५.०४.१९९० व दि.११.१२.१९९७ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत “एक कुटूंब, एक खाता, एक नोकरी” या सुत्रानुसार आजपर्यंत 690 प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

पोलीस अहवालानुसार दि.२१ डिसेंबर, २०२० रोजी श्री. जगदीश किसन वारगुडे हा तरुण त्याचे राहते घरी असताना त्याचे पोटात दुखून, चक्कर येवून मयत झाला आहे. त्याचप्रमाणे अन्य दोन वृध्द शेतकऱ्यांना अर्धांगवायूचा झटका आल्याबाबत कोणत्याही हॉस्पीटलमधून नागोठणे पोलीस स्टेशनला एम एल सी आली नसल्याचे नागोठणे पोलीस स्टेशनकडील दि. १३/०२/२०२१ रोजीचे अहवालामध्ये नमूद आहे.

(३) प्रकल्पबाधीतांच्या नुकसान भरपाई संदर्भात दि. १९/११/२०२० रोजी उपविभागीय अधिकारी, कर्जत यांचे कार्यालयात बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीस कंपनीचे अधिकारी/प्रतिनिधी अनुपस्थित राहिले. रिलायन्स गॅस पाईपलाईन लि. ही कंपनी रिलायन्स इथेन पाईपलाईन लिमीटेड मध्ये विलीन झाली असून सदर DNEPL साठी नविन सक्षम प्राधिकाऱ्यांची नेमणूक झाल्यानंतर सदर विषयाबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(४) लोकशासन आंदोलन संघर्ष समिती यांनी सुरु केलेल्या आंदोलनाचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, रोहा यांनी त्यांचे कार्यालयात दि.०७/१२/२०२० रोजी बैठक आयोजित केली होती. तसेच मा. खासदार श्री. सुनिल तटकरे यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात दि.१६/१२/२०२० रोजी व दि. ३१/१२/२०२० रोजी बैठक घेणेत आली. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार रिलायन्स व्यवस्थापन व आंदोलक यांचेमध्ये समेट होवून, आंदोलन मागे घेण्याच्या अटीवर २०६ प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याचे रिलायन्स प्रशासनाने मान्य केले आहे. त्यानुसार दि.१८/०१/२०२१ रोजी आंदोलन मागे घेणेत आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनीतर्फे परिक्षा घेऊन निवड केलेल्या कनिष्ठ अभियंत्यांना नियुक्ती देण्याबाबत

**(३७) *२१२३८ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनीद्वारे सरळसेवा भरती अंतर्गत दिनांक १३ नोव्हेंबर २०१९ रोजी कनिष्ठ अभियंत्यांची ३२७ पदांकरिता परिक्षा घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिक्षेचा निकाल दिनांक १७ जानेवारी, २०२० रोजी जाहीर करण्यात आला त्यानुसार उमेदवारांची कागदपत्रे पडताळणीची प्रक्रिया दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी पुर्ण करण्यात आली असून देखील अदयापपर्यंत निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कनिष्ठ अभियंता पदासाठी परिक्षेद्वारे निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत लोकप्रतिनिधी बल्लारपूर यांनी सचिव, ऊर्जा विभाग, मुंबई यांना दिनांक ४ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) खरे आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार, विधानसभा सदस्य यांचे प्रधान सचिव ऊर्जा यांना उद्देशुन लिहिलेले दि. २१.०७.२०२० चे निवेदन ऊर्जा विभागास प्राप्त झाले आहे.

जाहिरात क्र. ०६/२०१९ अन्वये पदविका- अभियंता प्रशिक्षणार्थी पदासाठी ३२७ जागांची जाहिरात महावितरण कंपनीतर्फे देण्यात आली होती. सदर जाहिरातीद्वारे भरावयाच्या पदांचा निकाल दि.१७.०१.२०२० रोजी जाहीर करण्यात आला. सदर पदांसाठी निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी दि. ०४ व ०५ फेब्रुवारी, २०२० रोजी करण्यात आली. त्यांनतर कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात राज्याची कर व करेतर उत्पन्नातील अपेक्षित महसूली घट व त्याचे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम विचारात घेऊन वित्त विभागादवारा दि. ०४.०५.२०२० च्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग वगळता कोणत्याही विभागाने कोणत्याही प्रकारची नवीन पद भरती करु नये असे निर्देश देण्यात आले होते.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि. ०९.०९.२०२० रोजीच्या अंतरिम आदेशास अनुसरुन सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एस.ई.बी.सी) वर्गातील उमेदवारांना सन २०२०-२०२१ या वर्षातील सरळ सेवा भरतीकरीता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (ई.डब्ल्यू.एस.) प्रमाणपत्र देण्यास सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २३.१२.२०२० च्या शासन निर्णयाद्वारे निर्देश दिले. त्याअनुषंगाने ऊर्जा विभागाने दि.१०.०२.२०२१ च्या पत्रान्वये पदभरतीबाबत महावितरण कंपनीला कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार महावितरण कंपनीच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## राज्याच्या इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या अनुदानित शासकीय आश्रमशाळांचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(३८) * २१८७७ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या अनुदानित शासकीय आश्रमशाळांचे शासनामार्फत देण्यात येणारे परिपोषण तसेच वेतनोत्तर अनुदान आर्थिक अडचणीमुळे काही वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान न मिळाल्याने संस्थाचालकांना कर्ज काढून संस्था चालवाव्या लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांवर त्याचा परिणाम होत असल्याने संस्थाना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार :** (१) होय

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत सुरु असलेल्या सर्व आश्रमशाळांसाठी सन २०१९-२० पर्यंतचे मागणी केल्यानुसार संपुर्ण परिपोषण व वेतनेतर अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## वर्धा, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये दारू बंदी असताना अवैध व बनावट दारूचा पुरवठा होत असल्याबाबत

**(३९) * २०९८६ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये दारू बंदी असताना अवैध व बनावट दारूचा पुरवठा होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर, यवतमाळ, अमरावतीसह मध्यप्रदेश येथून या जिल्ह्यांमध्ये बनावट दारूचा पुरवठा होत असतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार अवैध व बनावट दारु पुरवठा करणाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली या दारुबंदी असलेल्या जिल्हयामध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून अवैध दारु विक्री, वाहतूक संदर्भात महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत एप्रिल, २०१५ पासून माहे जानेवारी, २०२१ पर्यंत

बनावट व दारु पुरवठा करणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन खालीलप्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहेत.

१. चंद्रपूर जिल्हा :- एप्रिल, २०१५ पासून माहे जानेवारी, २०२१ पर्यंत ३२९१ इतके गुन्हे नोंद केलेले असून एकूण १८०० आरोपी अटक करण्यात आले आहेत व रु.५.७४ कोटी किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

२. वर्धा जिल्हा :- एप्रिल, २०१५ पासून माहे जानेवारी, २०२१ पर्यंत एकूण ५४० गुन्हे नोंद करुन, २४३ आरोपींना अटक केली आहे व रु.९५.९५ लाख किमतीचा मुद्देमाल २६ वाहनांसह जप्त केला आहे.

३. गडचिरोली जिल्हा :- एप्रिल, २०१५ पासून माहे जानेवारी, २०२१ पर्यंत एकूण ८४४ गुन्हे नोंद केले असून, ६२५ आरोपींना अटक केली आहे. व रु.२.६१ कोटी किमतीचा मुद्देमाल १०७ वाहनांसह जप्त केला आहे.

कोरडया जिल्हयात अवैधरित्या व नियमभंग करुन दारुचा पुरवठा / विक्री करणाऱ्या अथवा असा संशय असलेल्या नागपूर जिल्हयातील ११ आणि यवतमाळ जिल्हयातील १५ अनुज्ञप्तीधारकांविरुध्द राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत कारवाई करण्यात आली आहे.

तसेच, या तिन्ही जिल्हयाच्या सीमाभागात गस्त घालणे, वाहनांची तपासणी करणे व खबऱ्यांमार्फत गोपनीय माहिती घेऊन अवैध दारुविरुध्द वेळोवेळी कारवाई करण्यात येत आहे.

(४) वर्धा, गडचिरोली आणि चंद्रपूर या दारुबंदी असलेल्या जिल्हयात अवैध मद्य / दारु निर्मिती, वाहतूक, विक्री व साठवणूक प्रकरणी संबंधित गुन्हेगारांविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये सतत कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोरीवली (मुंबई) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी कुटुंबियांच्या पुनर्वसनाबाबत

**(४०) * २०५२१ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), अॅड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली (मुंबई) येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील ३२० एकर जमिनीवर १ हजार ८५० आदिवासी कुटुंब वास्तव करीत असून सदर उद्यान राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषीत केले असल्याने आदिवासी कुटुंबाचे पुनर्वसन सन १९९६ पासून आजतागायत झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी कुटुंबियांचे वास्तव्य वन विभागाच्या हद्दीत असून त्यांना वीज व अन्य मुलभूत सुविधापासून वंचित रहावे लागत असल्याने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात राहणाऱ्या आदिवासींना अन्यत्र हलविण्यापेक्षा उद्यानातच जैवविविधता कमी असलेल्या ठिकाणी त्यांचे पुनर्वसन करावे अशी मागणी “रिव्हर मार्च” या स्वयंसेवी संस्थेने संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रशासन, वनेमंत्री व मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२०, मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थेमार्फत राष्ट्रीय उद्यानाच्या ताब्यातील जैवविविधतेचे प्रमाण कमी असलेल्या ठाकूर व्हीलेज जवळील ५० एकर जमिनीवर आदिवासीचे पुनर्वसन करावे असा प्रस्ताव मांडण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू जागेवर सन १९९८ साली आदिवासींच्या स्थलांतराची योजना आखली होती, मात्र सदरहू योजना आजमितीस कार्यान्वित होऊ शकलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त योजना कार्यान्वित न होण्यामागील कारणे काय आहेत, तसेच रिव्हर मार्च या स्वयंसेवी संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे :** (१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे व्यवस्थापन सन १९६९ मध्ये वनखात्याकडे सोपविण्यात आले. त्यावेळी उपलब्ध अभिलेखानुसार ११ पाडयांमध्ये एकूण ४६ आदिवासी कुटुंबे होती.

सदर ४६ आदिवासी कुटुंबांचे सन १९७७ मध्ये पालघर तालुक्यातील मौजे खुटल येथे पुनर्वसन करण्यात आले होते. तथापि, थोडयाच दिवसांत सदर कुटुंबे उद्यानात परत आली. रिट याचिका क्रमांक ३०५/१९९५ व ९२५/२००० मध्ये मा. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशांनुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाड्यातील कुटुंबियांचे इतर अतिक्रमकांप्रमाणे पुनर्वसन करावयाचे आहे.

सन २०१० मध्ये केलेल्या आदिवासी पाड्यांचे सर्वेक्षणानुसार, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीत एकूण ४३ आदिवासी पाडे असून त्यात एकूण १७९५ आदिवासी कुटुंबे असल्याचे दिसून आले आहे.

सदर आदिवासी कुटुंबांचे आरे वसाहत येथील वन विभागाच्या ताब्यातील ४३ एकर क्षेत्रावर पुनर्वसन म्हाडाव्दारे कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) व (३) मौजे मागाठाणे, सर्वे क्रमांक ३४/ब मधील उद्यानाच्या ताब्यातील ५० एकर अवर्गीकृत वनक्षेत्रात संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी कुटुंबांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव रिव्हर मार्च या संस्थेने दिनांक १२.०२.२०२० रोजीच्या पत्रान्वये वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांचेकडे सादर केला आहे.

(४) व (५) सन १९९६ मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये असलेल्या ११ आदिवासी पाड्यांमधील कुटुंबांचे मौजे मागाठाणे, अवर्गीकृत वन, सर्वे क्र. ३४/ब मध्ये तिनमुर्ती व चिंचपाडा या पाड्यांना लागून असलेल्या क्षेत्रावर करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता.

सन २०१० मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील २८ आदिवासी पाड्यांमधील १०५४ कुटुंबांचे पुनर्वसन संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील

कृष्णगिरी उपवन व तुळशी वन परिक्षेत्रातील वनक्षेत्रावर करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमक व आदिवासी पाडे यांचे पुनर्वसनाचे आरे वसाहतीमधील मौजे मरोळ-मरोशी येथील न.भू.क्र. १६८९ पै, १६९० पै. व १६९७ पै. येथील वन विभागाच्या ताब्यातील ९० एकर क्षेत्रात करण्याचे प्रस्तावित आहे. त्या नुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाडे व पात्र अतिक्रमक यांचे सर्वेक्षण करणे व पात्रता निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्याकरिता आदिवासी पाडे व झोपडपट्टीतील अतिक्रमकांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण सध्या प्रगतीपथावर आहे. सदर पुनर्वसन म्हाडा मार्फत करण्याचे प्रस्तावित आहे.

रिव्हर मार्च या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावामधील पुनर्वसनाकरीता प्रस्तावित केलेले क्षेत्र हे वनक्षेत्र आहे.

-----------------

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी देण्यात आलेल्या अनुदानाचे लेखापरीक्षण करण्याबाबत

**(४१) * २२६७४ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी सन २००६ ते २०२० या १४ वर्षाच्या कालावधीत सुमारे २८९ कोटी रुपये अनुदान देण्यात आले आहे परंतू उक्त अनुदानाचे विभागाकडून लेखापरीक्षण करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाच्या ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर या अप्पर आयुक्त कार्यक्षेत्रातील १७२ शाळांमध्ये ४७ हजार ७६३ विद्यार्थ्यांनी नामांकित शाळांमध्ये प्रवेश घेतला असून उक्त शाळांना प्रत्येक विद्यार्थ्यामागे ४० हजार रुपये अनुदान देण्यात आले आहे परंतू या अनुदानाचे लेखापरीक्षण करण्यात आले नसल्याने अनुदानाची रक्कम शैक्षणिक उपक्रमासाठी खर्च झाली किंवा नाही याबाबत नागरिकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी आदिवासी विकास मंत्री, सचिव, आदिवासी विकास विभाग, आयुक्त, अप्पर आयुक्त किंवा प्रकल्प अधिकारी यांनी कोणतीही दखल घेतली नसून उक्त प्रकरणात आदिवासी विभागाचे कर्मचारी व संस्थाचालक यांचे संगनमत असल्याने लेखापरीक्षण करण्यात आले नसल्याची बाब निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुषंगाने सन २००६ ते २०२० या कालावधीत अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी दिलेल्या अनुदानाचे तात्काळ लेखापरिक्षण करुन लेखापरीक्षणास जाणीवपुर्वक विलंब करण्याऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) हे खरे नाही.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता पहिली ते इयत्ता बारावी पर्यंत शिक्षण देणे ही योजना शासन निर्णय दिनांक २८.०८.२००९ अन्वये सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात आलेली आहे.

अपर आयुक्त, नाशिक, ठाणे, अमरावती व नागपूर यांच्या अंतर्गत नामांकित निवासी शाळा योजनेतंर्गत एकूण १७२ नामांकित शाळा कार्यरत आहेत. सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात ५३,२७५ इतके विद्यार्थी शिक्षण घेत होते. सदर विद्यार्थ्यांच्या देय असलेल्या शुल्कापोटी नामांकित निवासी शाळांना आतापर्यंत एकूण रु.१०७१,९५,६६,५२२/- अदा करण्यात आले आहेत.

सदर योजनेंतर्गत प्रवेशित आदिवासी विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने इंग्रजी माध्यमाच्या खाजगी कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्वावर असलेल्या शाळांना शासन निर्णय दिनांक १८.०५.२०१८ मधील निकषांच्या आधारे गुणांकन करून प्राप्त गुणानुसार शुल्क निर्धारीत करण्यात येते.

तसेच आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत प्रकल्प कार्यालयामार्फत संबंधित नामांकित शाळांची नियमितपणे तपासणी केली जात असून शुल्काचा अंतीम टप्पा अदा करण्यापूर्वी शाळेची प्रत्यक्ष तपासणी करुन सर्व देय सोयी सुविधा, त्यांचा दर्जा, विद्यार्थी उपस्थिती इत्यादी सर्व बाबींची पडताळणी करुन आवश्यक असल्यास देय शुल्क रक्कमेतुन दरवर्षी कपात सुध्दा करण्यात येते.

(२) हे खरे नाही.

नामांकित योजनेंतर्गत कार्यरत १७२ शाळांमधील ५३,२७५ प्रवेशित विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने देय शुल्क रक्कम वितरणाची सर्व प्रक्रिया आधार लिंक असून विद्यार्थी आधार पडताळणी करुन व प्रकल्प कार्यालयामार्फत विद्यार्थी उपस्थिती व त्यांना देय वस्तु, सोयी सुविधांची खात्री करुनच ऑनलाईन आधार लिंक पोर्टल वर विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यता दिली जाते. तद्नंतरच त्यांच्या देय शुल्कापोटी ५० % व ५० % प्रमाणे शुल्क संस्थाना दिले जाते. शैक्षणिक वर्षात आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत प्रकल्प कार्यालयामार्फत संबंधीत शाळांची तपासणी नियमितपणे करून देय शुल्काचा अंतिम टप्पा अदा करण्यापूर्वी पुनश्च शाळांची प्रत्यक्ष तपासणी करून सर्व देय सोयी सुविधा, त्यांचा दर्जा, विद्यार्थी उपस्थिती इ. सर्व बाबींची पडताळणी केल्यानंतरच आवश्यक असल्यास उर्वरीत शुल्क रक्कमेतून दरवर्षी कपात सुध्दा करण्यात येते.

(३) आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांच्या दिनांक १७.१०.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सर्व अपर आयुक्त निहाय कार्यरत असलेल्या नामांकित निवासी शाळांचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | अपर आयुक्त | शाळांची संख्या | लेखापरीक्षण झालेल्या शाळांची संख्या | प्रलंबित असलेल्या शाळांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ५१ | ५१ | ० |
| २ | ठाणे | ३१ | २४ | ८ |
| ३ | अमरावती | ४५ | ० | ४५ |
| ४ | नागपूर | ४५ | ८ | ३७ |
| | एकूण | १७२ | ८३ | ८९ |

कोविड-१९ या रोगाच्या महामारीमुळे वरील ८९ नामांकित शाळांचे लेखापरीक्षण करणे शक्य झाले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील कर्नाळा नागरी सहकारी बँकेतील ठेवीदार व खातेदारांच्या ठेवीची रक्कम तातडीने परत मिळण्याबाबत

**(४२) * २०४३७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील कर्नाळा नागरी सहकारी बँकेमध्ये ठेवीदार व खातेदारांच्या ठेवी सन २०१९ पासून बँकेतच अडकून पडल्यामुळे खातेदार व ठेवीदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खातेदार व ठेवीदारांची रक्कम परत देण्यासाठी बँकेच्या संचालक मंडळाची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करून मालमत्तेच्या लिलावातून खातेदार व ठेवीदारांना त्यांच्या ठेवीची रक्कम परत केली जाऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन बँकेच्या संचालक मंडळाची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करून सदर मालमत्तेच्या लिलावातून ठेवीदारांना त्यांच्या ठेवीची रक्कम तातडीने परत मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) व (२) होय.

(३) रिझर्व्ह बँकेने दि. २२.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कर्नाळा बँकेच्या ५९ कर्ज प्रकरणांची तपासणी करण्याचे निर्देश सहकार आयुक्तांना दिले. त्यानुषंगाने सहकार आयुक्तांनी दि. १०.०५.२०१९ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांची नियुक्ती केली. रिझर्व्ह बँकेने नमुद केलेली ५९ कर्जप्रकरणे व जिल्हा विशेष लेखापरिक्षक, रायगड-अलिबाग त्यांचे तपासणीत आढळलेल्या इतर ४ असे एकूण ६३ कर्जप्रकरणांसंबंधी रु. ५१२.५४ कोटी एवढ्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याचा अहवाल जिल्हा विशेष लेखापरिक्षक, रायगड-अलिबाग यांनी सादर केला. सदर अहवालाच्या अनुषंगाने बँकेचे कर्जदार व संचालक अशा एकूण ६३ जणांविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, एम.पी.आय.डी. ॲक्ट व भारतीय दंड विधान (IPC) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (CID), पुणे यांचेकडे सोपविण्यात आला असून तपासाची पुढील कार्यवाही त्यांचे स्तरावर सुरु आहे.

सहकार आयुक्त यांचे दि. २०.०२.२०२० च्या आदेशानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांची बँकेच्या प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

सहकार आयुक्त यांचे दि. १८.०६.२०२० रोजीच्या आदेशानुसार कलम ८८ अन्वये बँकेचे कर्जदार व संचालक अशा एकूण ६३ जणांविरुध्द आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून

उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे शहर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे टेण (जि.पालघर) येथे सामाजिक वनीकरण विभागाच्या जैवविविधता उद्यानामध्ये काम करणाऱ्या मजुरांचे वेतन थकीत असल्याबाबत

**(४३) * २०९९६ श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे टेण (जि.पालघर) येथे सामाजिक वनीकरण विभागाच्या जैवविविधता उद्यानामध्ये काम करणा-या सुमारे ४५ ते ५० वनवासी मजुरांचे आठ लाख रुपयांचे वेतन थकीत असल्याची बाब माहे डिसेंबर २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मजुरांचे थकीत वेतन अदा न केल्यास आदिवासी एकता मित्रमंडळाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचे संकेत देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मजुरांचे वेतन थकविल्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे :** (१) सामाजिक वनीकरण विभागाच्या मौजे टेण (जि. पालघर) येथील जैवविविधता उद्यान परिसरात रोपवाटिका तयार करण्यात आली आहे. सदर रोपवाटिकेत काम करणाऱ्या ३६ मजूरांची ७,००,४३८/- इतकी मजूरी प्रलंबित आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) वित्त विभागाचे परिपत्रक दिनांक ४.०५.२०२० च्या सूचनेनुसार कार्यक्रमांतर्गत योजनांसाठी सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पित निधीच्या ३३% च्या मर्यादेत खर्च करणे बंधनकारक असल्याने सदर योजनेस कमी अनुदान प्राप्त झाल्याने मजूरांची मजूरी थकीत आहे.

सदर योजनेत पर्याप्त अनुदान प्राप्त झाल्यानंतर संबंधित सर्व मजुरांचे मजूरी अदा केली जाईल.

-----------------

## राज्यातील स्थानिक स्वराज संस्थांकडील वीज देयकांच्या थकबाकीबाबत

**(४४) * २०५२५ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.राजेश पवार (नायगांव), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्थानिक स्वराज संस्थांकडील वीज देयकांच्या थकबाकीमध्ये ग्रामपंचातीच्या दिवाबत्ती योजनेचे प्रमाण मोठे असून या योजनेसाठी तरतूद करताना शासनाकडून अद्यापही दहा ते पंधरा वर्षांपूर्वीचा वीज वापर व दर गृहीत धरला जात असल्याने प्रत्यक्षात वार्षिक देयक ९५० कोटी रुपये असताना तरतूद मात्र २२८ कोटी रुपयांची करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थांना वीज देयकांचा भरणा करण्यासाठी शासनाकडून दिले जाणारे अनुदान पुरेशा प्रमाणात दर महिन्याला अग्रिम स्वरुपात अदा करण्याची विनंती महावितरणकडून राज्य शासनास करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांकडील थकबाकी वाढत असून, पथदिवे, दिवाबत्ती व पाणी पुरवठा योजनेची देयके अनेक वर्षे प्रलंबित असल्याने सात हजार कोटींहून अधिक रक्कम थकल्याचे महावितरण कंपनीने शासनाच्या निदर्शनास आणून दिले असून १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून स्थानिक स्वराज्य संस्थांकडील १०० टक्के थकबाकी कापून घेऊन ती महावितरणाकडे थेट वळती करण्याची विनंतीही महावितरणने शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महावितरणाच्या सदरहू मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.

(२) हे अशंत: खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) महावितरणाच्या थकबाकी अदा करण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उचित कार्यवाही शासन स्तरावरून करण्यात येईल.

(५) लागू नाही.

-----------------

## शहाबाज (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीमधील मौजे जुई-बापूजी येथील कांदळवनाची जमीन अनधिकृतरित्या ताब्यात घेतल्याबाबत

**(४५) * २२६८३ श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहाबाज (ता.अलिबाग जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील मौजे जुई-बाबूजी येथील १.८४ हेक्टर शासकीय जमिनीवरील कांदळवनाची तोड करुन जे.एस.डब्ल्यू. कंपनी व्यवस्थापनाने बेकायदेशीररित्या जमीन ताब्यात घेतल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते श्री संजय सावंत यांनी मा. महसूल मंत्री, प्रधान सचिव, महसूल व वनविभाग अधिकारी यांना तक्रारी केल्यानंतर कोकण आयुक्त यांनी जिल्हाधिकारी रायगड यांना त्वरित कारवाई करण्याचे आदेश देण्यात येवूनही व्यवस्थापनावर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जमिनीवर कंपनी व्यवस्थापनाने कंपनीच्या विस्तारासाठी मातीचा भराव, संरक्षण भिंत तसेच कन्व्हेअर बेल्टसाठी सिमेंट कॉंक्रीटचे बांधकाम केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अलिबागचे उप वनसंरक्षक यांच्या आदेशानुसार परिक्षेत्र वन अधिकारी यांनी दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास गुन्हा नोंदविला होता, तसेच महसूल विभागानेही जे.एस.डब्लु. व्यवस्थापनावर गुन्हा नोंदविण्यात यावा अशा आशयाचे पत्र दिनांक ०५ फेब्रुवारी २०२० रोजी वा त्यासुमारास तहसीलदार, अलिबाग यांना दिलेले असतानाही महसूल विभागाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, उक्त प्रकरणी कारवाई करण्यास होत असलेल्या विलंबाचा अहवाल देण्याबाबतचे पत्र निवासी उपजिल्हाधिकारी यांनी महसूल उपविभागीय अधिकारी व वनउपसंरक्षक अधिकाऱ्यांना पाठविण्यात आले आहे परंतू सदर पत्रात ठोस कारवाई करण्याचे आदेश तसेच संदिग्धता असल्याने सदर प्रकरणी पर्यावरण मंत्री यांनी चौकशी करण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर व कांदळवनाची कत्तल करुन बेकायदेशीररित्या ताब्यात घेतल्या प्रकरणी संबंधित कंपनी व्यवस्थापनावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे :** (१) हे खरे नाही. सदरची बाब यापूर्वी २०१९ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही. मौजे जुईबापूजी ता. अलिबाग येथील स. नं. ५० ड क्षेत्र १- ८४.०० हे आर गा. न. नं. ७/१२ सदरी या खाजन / राखीव वने नोंद असलेल्या जमिनीवर जे. एस. डब्ल्यु. कंपनीने कांदळवनाचे क्षेत्र नष्ट करुन अतिक्रमण करुन वनेतर कामे केले असल्याने सदर कंपनी विरुद्ध पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चे कलम १९ अन्वये मा. मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात आरसीसी नं. ८५/२०२० नुसार दावा दाखल करण्यात आला आहे. महसूली यंत्रणेद्वारे पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वीज ग्राहकांनी थकबाकी न भरल्यास वीज पुरवठा खंडीत करण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत

**(४६) * २०५७२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज ग्राहकांनी थकबाकी न भरल्यास त्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्याचे आदेश महाराष्ट्र राज्य विद्युत वीज वितरण कंपनी मर्या. यांनी दिले असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोविड १९ च्या काळात अनेक उद्योगधंदे बंद असल्यामुळे तसेच महागाईमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असताना ग्राहकांना वाढीव वीज देयके आकारल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, थकबाकी वसूल करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवरही कारवाईचे संकेत वितरण कंपनीने दिले आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून ग्राहकांना वीज देयके भरण्यास सवलत देऊन विद्युत वीज वितरण कंपनीने दिलेला आदेश रद्द करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे. एप्रिल, २०२० पासून आजपर्यंत एकही वीज देयक न भरलेल्या ग्राहकांचा वीज पुरवठा खंडीत करण्यासंबंधी दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी ७२,८१,४०४ ग्राहकांना महावितरण कंपनीमार्फत विद्युत अधिनियम, २००३ कलम ५६ नुसार नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत.
(२) लॉकडाऊनच्या काळात व्यापारी व औद्योगिक वीज ग्राहकांचे माहे एप्रिल, मे व जून, २०२० च्या वीज देयकामध्ये लागू असलेले स्थिर आकार स्थगित करण्यात आलेले होते व ते अनुक्रमे माहे ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२० या महिन्यांच्या वीज देयकांमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

हिवाळयाच्या वापरानुसार निघालेली कमी सरासरी युनिटची देयके, लॉकडाऊन तसेच उन्हाळयामुळे वाढलेला घरगुती वापर व १ एप्रिल २०२० पासून लागू झालेले नवीन दर हया सर्व बाबी एकत्रित आली असली तरी ग्राहकांना देण्यात आलेली देयके ही अचूक असून अधिक पारदर्शी आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) घरगुती ग्राहकांना लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर जाणवत असलेल्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन ज्या घरगुती ग्राहकांचे लॉकडाऊन नंतर प्रत्यक्ष मीटर

वाचनाप्रमाणे बिल आले आहे अशा महावितरण कंपनीच्या ग्राहकांनी त्यांचे संपूर्ण वीज बिल देय दिनांकापूर्वी भरले तर त्यांना देय रक्कमेवर २ % सवलत देण्यात आलेली आहे. दि. १६.०२.२०२१ पर्यंत एकूण ६९.७६ लाख घरगुती ग्राहकांनी २% सवलतीचा लाभ घेतला असून सवलतीची रक्कम ३८.९२ कोटी एवढी असून सदर रक्कम वीज बिलात समायोजित झालेली आहे.

तसेच जे ग्राहक लॉकडाऊन नंतर प्रत्यक्ष वाचनाप्रमाणे आलेल्या वीज बिलाचा एक रक्कमी भरणा करु शकत नाहीत, अशा ग्राहकांनी त्यांच्या वीज बिलाचा भरणा ३ (विलंब आकार व व्याज विरहित) सुलभ हप्त्यात भरण्याची सवलत देण्यात आली आहे. दि. १६.०२.२०२१ पर्यंत २८.२२ लाख घरगुती वीज ग्राहकांनी वीज बिल सुलभ हप्त्यात भरण्याचा पर्याय स्वीकारला आहे.

तसेच महावितरणच्या दिनांक १३.११.२०२० च्या परिपत्रकानुसार सर्व चालू असलेले अकृषक वीज ग्राहक व कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडीत असलेल्या ग्राहकांसाठी वीज देयक सुलभ हप्त्यात भरण्याची सुविधा देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**विधान भवन :** **श्री. राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.